सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# बी. एड्. (नियमित) अभ्यासक्रम (दोन वर्ष-२०१५-१७)

## प्रथम वर्ष प्रवेश - २०१५-२०१६

## केंद्रीय प्रवेश प्रक्रिया

# माहिती पुस्तिका

# नियमावली

• अनुक्रमणिका •


| | | |
|---|---|---|
| १. | नियमावली | ३-२० |
| २. | सामाईक प्रवेश परीक्षा नमुना प्रश्नपत्रिका-उत्तरांसहित | २१-२६ |
| ४. | इंग्रजी भाषा ज्ञान चाचणी परीक्षा नमुना प्रश्नपत्रिका - उत्तरांसहित | २७-३३ |
| ५. | सी.ई.टी. केंद्रांची यादी | ३४-३७ |
| ६. | वेळापत्रक | ३८ |



**केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समिती**

द्वारा : शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य

पहिला मजला, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१

प्रवेश-प्रक्रिया वेबसाईट : **http://bed.mhpravesh.in**

# बी. एड. (नियमित) अभ्यासक्रम (दोन वर्ष-२०१५-१७)
## बी. एड. (B. Ed.) (प्रथम वर्ष)
## (सन २०१५-२०१६)
## केंद्रीय प्रवेश प्रक्रिया, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
## शासन निर्णय

१. शासन निर्णय क्रमांक एसटीसी-१०९९/बी.एड. प्रवेश १४/९९ मशि - ३ दिनांक १९ जानेवारी, १९९९
२. शासन निर्णय क्रमांक एसटीसी-१०९९/बी.एड. प्रवेश १४/९९ मशि - ३ दिनांक २२ मार्च, २०००
३. शासन निर्णय क्रमांक एसटीसी-१०९९/बी.एड. प्रवेश २०/२००१ मशि - ३ दिनांक ३० जानेवारी, २००१
४. शासन निर्णय क्रमांक एसटीसी-२००२/१८/०२ मशि-३ दिनांक २६ फेब्रुवारी, २००२
५. शासन निर्णय क्रमांक यु.एस.जी./२००२/३३/०३/२ मशि-४ दिनांक १६ एप्रिल, २००३
६. शासन निर्णय क्रमांक एसटीसी-२००३/बी.एड. प्रवेश ११०/०३ मशि - ३ दिनांक ७ मे, २००३
७. शासन निर्णय क्रमांक मविस-२००२/(१६२-०३) दिनांक १९ नोव्हेंबर, २००३
८. शासन निर्णय क्रमांक एनजीसी-२००४/(४१/०४)/ मशि-३, दिनांक १६ फेब्रुवारी, २००४
९. शासन निर्णय क्रमांक एसटीसी-२००५/बी.एड.प्रवेश/(७०/०५) मशि, १८ मार्च, २००५
१०. शासन पत्र क्रमांक एनजीसी-२००५/(६१७/०५)/ मशि-३, दिनांक १ मार्च २००६
११. शासन पत्र क्रमांक एस.टी.सी.-२००६/(१७६/०६) मशि-३, दिनांक १४ जून २००६
१२. शासन पत्र क्रमांक संकिर्ण २००६/(१८९/०६) मशि-३, दिनांक ६ जुलै, २००६
१३. शासन पत्र क्रमांक बीएड २००६/(६३१/०६) मशि-१, दिनांक ६ जानेवारी २००७
१४. UGC - शुल्ककपात / मूळप्रमाणपत्र F. No. 1-3/2007 (CPP-II) 23rd April, 2007
१५. शासन पत्र क्रमांक बीएड २००७/(५५३/०७) मशि-९, दिनांक १५ फेब्रुवारी २००८
१६. शासन पत्र क्रमांक बीएड २००८/ (४२३/०७)/ मशि-१ दिनांक ३-३-२००९
१७. शासन निर्णय क्र. बीएड. २०१० (प्र. क्र.) ४५/१० मशि-२, दि. ९ एप्रिल २०१०
१८. एनसीटीई पत्र दि. ३१-८-२००९
१९. शासन शुद्धिपत्र क्र. बीएड - २०१०/ (प्र. क्र. ४५/१०)/ मशि-२, दि. ७-५-२०१०
२०. शासन निर्णय क्रमांक बीएड २०११/प्र. क्र. ४९/मशि-२, दि. ४ मे २०११
२१. शासन निर्णय क्रमांक बी.एड. २०१२ /प्र. क्र.२४/ मशि-२, दि. १५ मार्च २०१२
२२. शासन निर्णय क्रमांक बी.एड. २०१३ /प्र. क्र.१३/१३/ मशि-२, दि. १५ मे २०१३
२३. शासन निर्णय क्रमांक अशैसं- २०१२ /प्र. क्र.२१/कार्या-५, दि. २७ मे २०१३
२४. शासन निर्णय क्रमांक बी.एड. २०१४ /प्र. क्र.४४/१४/ मशि-२, दि. ८ मे २०१४
२५. राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद अधिसूचना (NCTE) २८ नोव्हेंबर, २०१४
२६. शासन निर्णय क्रमांक बी.एड.- ४६१५/प्र. क्र. १०/ १५/ मशि-२, दि. ६ जून २०१५
२७. शासन निर्णय क्रमांक बी.एड. ४६१५/ प्र. क्र. ७०/भाग-१/मशि-२, दि. २९ जून २०१५

### प्रवेश अर्ज, सामाईक प्रवेश परीक्षा व प्रवेश-प्रक्रियेचे शुल्क

१) **सामाईक प्रवेश परीक्षा (CET)**

अ) सामाईक प्रवेश परीक्षा ही मानसिक क्षमता, शिक्षक अभिक्षमता व सामान्यज्ञान या विषयांवर आधारित ५० गुणांची व १ तासाची वस्तुनिष्ठ (बहुपर्यायी प्रश्न) स्वरूपाची घेण्यात येईल.

ब) इंग्रजी माध्यमात प्रवेश-इच्छूक उमेदवारांना सीईटी परीक्षा अनिवार्य असून या व्यतिरिक्त इंग्रजी भाषा-ज्ञान-चाचणी ५० गुणांची आणि १ तासाची अनिवार्य राहील.

क) **सीईटीची भाषा : फक्त मराठी / इंग्रजी आहे.**

२) **प्रवेश अर्ज, सी.ई.टी. व प्रवेशप्रक्रिया शुल्क**

अ) **खुल्या संवर्गासाठी व महाराष्ट्राबाहेरील सर्व संवर्गासाठी रु. ६५०/-**

ब) **मागासवर्गीयांसाठी (अ. जा., अ. ज., वि. जा. भ. ज., इ. मा. व. व विमाप्र) रु. ३५०/-**

**सूचना :** एकापेक्षा अधिक प्रवेश प्रकारासाठी (७०टक्के, २८टक्के, २टक्के) / अध्यापन पद्धतीसाठी / माध्यमासाठी वेगळे शुल्क व अर्ज भरण्याची आवश्यकता नाही.

**कायदे-विषयक सल्लागार**

**डॉ. श्री. बी. व्ही. घाणेकर** M.A./LL.M., DLW (B.W), Ph.D. , **Advocate**, Rtd. Judicial Chamber, Bhopal Bench

**श्री. सी. आर. देशपांडे,** LL.B., LL.M.

(सदर पुस्तिकेत उल्लेख करण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रियेसाठी वेळोवेळी प्रसिद्ध झालेले शासन-निर्णय ग्राह्य धरण्यात आले आहेत व प्रवेश-प्रक्रियेच्या काळातही वेळोवेळी प्रसिद्ध झालेले प्रचलित शासन-निर्णय ग्राह्य धरण्यात येतील.)

# बी. एड. (नियमित) प्रथम वर्ष प्रवेश : २०१५-२०१६

## १. नियमावली

**१. प्रवेश प्रक्रियेची कार्यपद्धती**

१.१ (अ) महाराष्ट्रातील शासकीय, अशासकीय अनुदानित, अशासकीय विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित व अल्पसंख्यांक संस्था संचलित अनुदानित, विना अनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमध्ये बी. एड. (नियमित) प्रथम वर्ष अभ्यासक्रमासाठी द्यावयाचे प्रवेश सामाईक प्रवेश परीक्षा (Common Entrence Test -CET) घेऊन केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे (Govt. Centralised Admission Process - CAP) करण्यात येतील.

सदर प्रवेश प्रक्रियेची कार्यवाही संगणकामार्फत (Online) पद्धतीने करण्यात येणार आहे.

(ब) वर्ष २०१५-१६ पासून बी.एड. अभ्यासक्रम २ वर्षांचा करण्यात आला आहे. बी.एड. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी फक्त प्रथम वर्षाला सीईटी घेण्यात येणार असून प्रथम वर्ष उत्तीर्ण झाल्यानंतर संबंधित उमेदवारास त्याच महाविद्यालयात द्वितीय वर्षासाठी विहित शुल्क भरून आपोआप प्रवेश घेता येईल.

१.२ **भरावयाच्या जागा**

या परीक्षेतून उत्तीर्ण व पात्र उमेदवारांतून खालील प्रमाणे जागा भरण्यात येतील :

(अ) शासकीय व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालये - १००%

(ब) १. अशासकीय अनुदानित अल्पसंख्यांक महाविद्यालये - ५०%

२. शासकीय केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी अशासकीय विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित अल्पसंख्यांक महाविद्यालये - ४९%

(क) अनुदानित अल्पसंख्यांक महाविद्यालयांनी भरावयाच्या ५० टक्के जागा दिनांक १६ फेब्रुवारी, २००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतील वर्ष २०१५-१६ च्या सीईटी उत्तीर्ण पात्र उमेदवारांतूनच गुणवत्तेनुसार प्राधान्यक्रमाने व बी.एड. प्रवेश नियमांचे पालन करून संबंधित अल्पसंख्यांक उमेदवारांमधूनच गुणवत्तेनुसार प्राधान्यक्रमाने भरणे अनिवार्य राहील. प्रवेश प्रक्रिया पार पाडताना संबंधित अल्पसंख्यांक महाविद्यालयांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :

(१) प्रवेशित उमेदवारांना संबंधित महाविद्यालयाने त्यांच्या Login ID मधून प्रवेशपत्र काढून देणे आवश्यक राहील.

(२) अल्पसंख्यांक कोट्यांतर्गत प्रवेशित उमेदवारांची यादी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रमाणित करून घेणे आवश्यक राहील.

(३) संस्था अल्पसंख्यांक कोटा घेऊ इच्छित नसल्यास त्या जागा संस्थेला केंद्रीय प्रवेश प्रक्रियेकडे अल्पसंख्यांक आयोगाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करून समर्पित कराव्या लागतील. त्या व वरील १.२(ब) येथील प्रमाणानुसार जागा भरण्यात येतील.

(४) ज्या अल्पसंख्यांक संस्थेला अल्पसंख्यांक कोटा समर्पित करावयाचा आहे व त्या संस्थेस जर अल्पसंख्यांक कोट्याऐवजी सर्वसाधारण कोटा हवा असल्यास संस्थेस त्यांच्या महाविद्यालयात घटनात्मक आरक्षणानुसार पदभरती करायला हवी व विद्यार्थीसुद्धा घटनात्मक आरक्षणानुसार स्वीकारणे बंधनकारक राहील.

(५) केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारा अल्पसंख्यांक महाविद्यालयाला पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास, संस्थास्तरावर गुणवत्तेनुसार उमेदवार भरता येतील.

(ड) केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी **अशासकीय विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित अल्पसंख्यांक अध्यापक महाविद्यालयांना** अल्पसंख्यांक कोटा केंद्रीय प्रवेश प्रक्रिया (Govt. CAP) अथवा महाराष्ट्र विनाअनुदान अध्यापक महाविद्यालय संस्था चालक असोसिएशन (Asso. CAP) यांपैकी एकाच CAP मधून भरता येईल. दोन्ही CAP मधून एकत्रित भरता येणार नाही. तथापि शासनाची व असोशिएशनची प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर जागा रिक्त असल्यास जर शासकीय केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतील (Govt. CET) महाविद्यालयांना महाराष्ट्र विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालय संस्थाचालक असोसिएशनाच्या सामाईक परीक्षेतून (Asso. CET) पात्र शिल्लक उमेदवारांतून प्रवेश द्यावयाचे असतील किंवा (Asso. CET) मधील महाविद्यालयांना (Govt. CET) तून पात्र शिल्लक उमेदवारांतून प्रवेश द्यावयाचे असतील तर उच्च शिक्षण संचालनालयाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. प्रवेश प्रक्रिया पार पाडताना संबंधित अल्पसंख्यांक महाविद्यालयांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी :

(१) ज्या विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित अल्पसंख्यांक अध्यापक महाविद्यालयाने केंद्रीय प्रवेश प्रक्रिये (CAP) मधून अल्पसंख्यांक कोटा भरला आहे त्या महाविद्यालयाने प्रवेशित उमेदवारांना Login ID मधून प्रवेशपत्र काढून देणे आवश्यक राहील.

(२) अल्पसंख्यांक कोट्यांतर्गत प्रवेशित उमेदवारांची यादी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारा प्रमाणित करून घेणे आवश्यक राहील.

(३) केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी अशासकीय विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित अल्पसंख्यांक अध्यापक महाविद्यालयाने महाराष्ट्र विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालय संस्थाचालक असोसिएशनमार्फत अल्पसंख्यांक कोटा भरला असेल तर अल्पसंख्यांक कोट्यांतर्गत प्रवेशित उमेदवारांची यादी महाराष्ट्र विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालय संस्थाचालक असोसिएशन तसेच प्रवेश नियंत्रण समितीकडून मान्य करून घेणे अनिवार्य राहील.

(४) संस्था अल्पसंख्यांक कोटा घेऊ इच्छित नसल्यास त्या जागा संस्थेला केंद्रीय प्रवेश प्रक्रियेकडे अल्पसंख्यांक आयोगाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करून समर्पित कराव्या लागतील. त्या व वरील १.२(ब) येथील प्रमाणानुसार जागा भरण्यात येतील.

(५) ज्या अल्पसंख्यांक संस्थेला कोटा समर्पित करावयाचा आहे व त्या संस्थेस जर अल्पसंख्यांक कोट्याऐवजी सर्वसाधारण कोटा हवा असल्यास संस्थेस त्यांच्या महाविद्यालयात घटनात्मक आरक्षणानुसार पदभरती करायला हवी व विद्यार्थीसुद्धा घटनात्मक आरक्षणानुसार स्वीकारणे बंधनकारक राहील.

(६) अल्पसंख्यांक कोट्यांतर्गत केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारा पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास संस्थास्तरावर गुणवत्तेद्वारा उमेदवार भरता येतील.

(इ) महाराष्ट्र विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालय संस्थाचालक असोसिएशनचे सदस्य असलेल्या अशासकीय विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात संघटनेमार्फत घेतलेली त्या त्या वर्षाची सामाईक परीक्षा (Asso. CET) व (Asso. CAP) द्वारे एक खिडकी योजनेअंतर्गत (Single Window System) प्रवेश होणे बंधनकारक राहील. तथापि, शासनाची व असोशिएशनची प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर जागा रिक्त असल्यास शासकीय केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतील (Govt. CET) मधील महाविद्यालयांना महाराष्ट्र विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालय संस्थाचालक असोसिएशनच्या सामाईक परीक्षेतून (Asso. CET) तील पात्र शिल्लक उमेदवारांतून प्रवेश द्यावयाचे असतील, किंवा (Asso. CET) मधील महाविद्यालयांना (Govt. CET) मधून पात्र शिल्लक उमेदवारांमधून प्रवेश द्यावयाचे असतील, तर उच्च शिक्षण संचालनालयाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. महाराष्ट्र विनाअनुदान अध्यापक महाविद्यालय संस्थाचालक असोसिएशनकडून शासकीय केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतील (Govt. CET) विद्यार्थी Association CAP मध्ये प्रवेशित करावयाचे असल्यास उच्च शिक्षण संचालनालयाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. तसेच शासकीय केंद्रीय प्रवेश प्रक्रियेशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयांना महाराष्ट्र विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालय संस्थाचालक असोसिएशनच्या सामाईक परीक्षेतून (Asso. CET) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना Govt. CAP मधून प्रवेशित करावयाचे असल्यास संचालनालयाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. मा. सर्वोच्च न्यायालय/ मा. उच्च न्यायालय/प्रवेश नियंत्रण समितीचे निर्णय/शासनाकडून वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात आलेले प्रचलित निर्णय व नियम बंधनकारक राहतील. महाविद्यालयात प्रवेशित उमेदवारांची यादी असोसिएशनद्वारा प्रमाणित करून घेऊन नंतर प्रवेश नियंत्रण समितीकडून मान्य करून घेणे बंधनकारक राहील.

## २ केंद्रीय सामाईक प्रवेश परीक्षेसाठी (CET) पात्रता :

२.१ **अ)** (१) (i) मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या B.Sc. (विज्ञान / गणित इत्यादी), B.A. सामाजिक शास्त्रे (इतिहास/भूगोल/अर्थशास्त्र/राज्यशास्त्र/मानसशास्त्र/तत्त्वज्ञान/शिक्षण/ग्रंथालय शास्त्र इत्यादी) तसेच B.A.मानव्यशास्त्रे (भाषा व साहित्य) विद्याशाखेची ३ वर्षांची पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला असेल व पदवी किंवा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाला खुल्या संवर्गातील उमेदवाराला किमान ५० टक्के (४९.५० टक्के ते ४९.९९ टक्के पर्यंतचे गुणधारकांचे गुण ५० टक्के इतके गणन्यात येतील) व मागासवर्गीय संवर्गातील (अ.जा., अ.ज., वि.जा.भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र.) ज्या उमेदवारांना किमान ४५ टक्के गुण (४४.५० टक्के ते ४४.९९ टक्के पर्यंतचे गुणधारकांचे गुण ४५ टक्के इतके गणन्यात येतील.) महाराष्ट्राबाहेर विद्यापीठातील पदवी प्राप्त सर्व संवर्गातील ज्या उमेदवारांनी किमान ५० टक्के गुण प्राप्त केले आहेत (४९.५० ते ४९.९९ टक्के पर्यंतचे गुणधारकांचे गुण ५० टक्के इतके गणन्यात येतील) असे उमेदवार बी.एड. प्रथमवर्ष अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षेस (CET) बसण्यास व बी.एड. प्रवेशास पात्र राहतील.

(ii) अभियांत्रिकी व तंत्रज्ञानमध्ये (गणित व विज्ञान विषय विशेष म्हणून असलेले) उमेदवार तसेच मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या २.१ (अ) (i) मधील विद्याशाखा सोडून इतर सर्व विद्याशाखांच्या पदव्या (उदा. वाणिज्य, व्यवस्थापन, अभियांत्रिकी, संगणक, विधी, माहिती तंत्रज्ञान, कृषि, बी. बी. आय., वैद्यकशास्त्र, समाजशास्त्रातील २.१ (अ)(i) मध्ये नमूद केलेले विषय सोडून इतर विषय, फाईनआर्ट, परफॉर्मिंग आर्ट - संगीत/नृत्य/नाट्य इ.)

तसेच महाराष्ट्र शासनाने पदवी समकक्षता दिलेला कोणताही अभ्यासक्रम पूर्ण केला असेल व पदवीला किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमाला खुला संवर्गातील उमेदवाराला किमान ५५ टक्के गुण (५४.५० ते ५४.९९ टक्के पर्यंतचे गुणधारकांचे गुण ५५ टक्के इतके गणन्यात येतील.) व मागासवर्गीय संवर्गातील (अ.जा., अ.ज., वि.जा.भ.ज., इ.मा.व., व वि.मा.प्र.) ज्या उमेदवारांना किमान ५० टक्के गुण (४९.५० टक्के ते ४९.९९ टक्के पर्यंतचे गुणधारकांचे गुण ५० टक्के इतके गणन्यात येतील.) महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठातील पदवी प्राप्त सर्व संवर्गातील ज्या उमेदवारांनी किमान ५५ टक्के गुण प्राप्त केले आहेत (५४.५० ते ५४.९९ टक्के पर्यंतचे गुणधारकांचे गुण ५५ टक्के इतके गणन्यात येतील) असे उमेदवार बी. एड. प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षेस (CET) बसण्यास व बी. एड. प्रवेशास पात्र राहतील.

(iii) **दोन वर्षांच्या किंवा एक वर्ष अभ्यासक्रमाची पदवी धारण करणारे पदवीधारक उमेदवार (मुक्त विद्यापीठातील पदवीप्राप्त उमेदवार वगळून) बी.एड. प्रवेशास पात्र राहणार नाहीत.**

(२) ज्या विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या गुणपत्रकात गुणांच्या ऐवजी श्रेणी (Grade) दिलेली असेल अशा उमेदवारांनी त्या त्या विद्यापीठाचे त्या श्रेणीशी (Grade) समकक्ष गुण प्रवेश अर्जात नोंदवावेत व प्रवेशाच्यावेळी समकक्ष गुण दर्शविणारे विद्यापीठ/महाविद्यालयाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच विद्यापीठाच्या विषयांचे संकेतांक (Code No.) दिलेले असतील तर त्यांनी विषयांच्या संकेतांकाचा (Code No.) तक्ता प्रवेशाच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

(३) उमेदवारांना पदवी परीक्षेच्या ज्या गुणांवर पदवी प्राप्त झाली आहे (विद्यापीठाने दिलेल्या अतिरिक्त गुणांची गणना करून) त्या एकूण गुणांची टक्केवारी किमान पात्रतेसाठी व गुणवत्तेसाठी मूळ गुण ग्राह्य धरले जातील. (उदा. काही विद्यापीठांत तीन वर्षांचे गुण एकत्रित करून पदवी दिली जाते, काही विद्यापीठांत दोन वर्षांचे गुण एकत्रित करून पदवी दिली जाते तर काही विद्यापीठांत केवळ तृतीय वर्षाच्या गुणांवर पदवी दिली जाते.) विद्यापीठाने श्रेणी / वर्ग देण्यासाठी स्वीकारलेल्या पद्धतीनुसार पदवी गुणांची गणना करण्यात येईल. तसेच मुक्त विद्यापीठांच्या पदवीधारकांच्या गुणांची गणना मुक्त विद्यापीठाने पदवीची श्रेणी प्रदान करण्यासाठी स्वीकारलेल्या पद्धतीनुसार करण्यात येईल.

**ब)** जे उमेदवार मार्च/एप्रिल २०१५ ला पदवीच्या अंतिम परीक्षेला बसलेले आहेत ते उमेदवार सामाईक प्रवेश परीक्षा (CET) देण्यास पात्र राहतील. महाविद्यालयांचा प्राधान्यक्रम भरण्याच्या कालावधीपर्यंत ज्या उमेदवारांच्या पदवी परीक्षेचा निकाल जाहीर होईल व जे २.१(अ) प्रमाणे, तसेच इंग्रजी माध्यमासाठी ५.१(ब) प्रमाणे पात्र असतील व जे प्राधान्यक्रम अर्ज (Option Form) भरतील अशा उमेदवारांचा सामावेश बी.एड. प्रवेश प्रक्रियेत केला जाईल.

क) **अतिरिक्त गुण :** खालील १,२ आणि ३ पैकी कोणत्याही एकाच संवर्गासाठी उमेदवाराशी नाते व संबंधितास सवलत देय असल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास संबंधित उमेदवारास (दोन टक्के) अतिरिक्त गुण देण्यात येतील.

१) स्वातंत्र्य सैनिकांची मुले/मुली/पती/पत्नी यांना

२) प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त कुटुंबातील उमेदवारांना

३) परितक्त्या/घटस्फोटित महिला/विधवांना.

ड) ज्या उमेदवारांचा प्रवेश प्रक्रियेच्या मधल्या काळात पदवी परीक्षेचा निकाल लागेल व ते बी.एड. प्रवेशासाठी नियम क्रमांक २.१(अ) व ५.१(अ) तसेच इंग्रजी माध्यमासाठी नियम क्र. २.१ व ५ प्रमाणे पात्र असतील तर त्यांस त्यावेळी प्राधान्यक्रम अर्ज (Option Form) भरता येईल व त्यानंतरच्या प्रवेश प्रक्रियेत त्यांचा समावेश केला जाईल. मात्र अशा उमेदवारांना प्राधान्यक्रम अर्ज भरण्यापूर्वी झालेल्या प्रवेश प्रक्रियेत गुणवत्तेनुसार स्थान मागता येणार नाही.

## ३. सामाईक परीक्षेचे स्वरूप :

३.१ सामाईक प्रवेश परीक्षा ही **मानसिक क्षमता, शिक्षक अभिक्षमता व सामान्यज्ञान** या विषयांवर आधारित ५० गुणांची व १ तासाची वस्तुनिष्ठ (बहुपर्यायी प्रश्न) स्वरूपाची घेण्यात येईल.

३.२ सामाईक प्रवेश परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेची भाषा मराठी व इंग्रजी असेल.

## ४. प्रवेश शुल्क (प्रवेश अर्ज, सीईटी व प्रवेश प्रक्रिया शुल्क) :

४.१ **खुल्या संवर्गासाठी व महाराष्ट्राबाहेरील सर्व संवर्गासाठी रु. ६५०/- .**

४.२ **महाराष्ट्रातील मागासवर्गीयांसाठी (अ.जा., अ.ज., वि.जा.भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र.) रु. ३५०/- .**

**सूचना : एकापेक्षा अधिक प्रवेश प्रकारासाठी (७० टक्के, २८ टक्के, २ टक्के) / अध्यापन पद्धतीसाठी / माध्यमासाठी वेगळे शुल्क व अर्ज भरण्याची आवश्यकता नाही.**

## ५. केंद्रीय सामाईक परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठीचे निकष :

५.१ अ) सामाईक प्रवेश परीक्षेस (**CET**) खुल्या संवर्गातील उमेदवारास ५० पैकी किमान १८ गुण व मागासवर्गीय संवर्गातील उमेदवारास किमान १५ गुण व महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठातील सर्व संवर्गातील उमेदवारास किमान १८ गुण मिळाले असतील तर ते उमेदवार बी.एड. अभ्यासक्रमाच्या प्रवेशाला पात्र राहतील.

ब) इंग्रजी माध्यमात प्रवेशोच्छूक उमेदवाराने सामाईक प्रवेश परीक्षेव्यतिरिक्त ५० गुणांची इंग्रजी भाषा ज्ञान चाचणी परीक्षा (ELCT) देणे आवश्यक असून, या चाचणी परीक्षेत सर्व संवर्गातील उमेदवारांना ५० गुणांपैकी किमान १८ (३६ टक्के) गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

## ६. अध्यापन पद्धतीच्या विषय निवडीबाबत :

### ६.१ शालेय विषयातील पदवी / पदव्युत्तर पदवी :

अ) उमेदवाराने जर शालेय विषयात पदवी/पदव्युत्तर पदवी प्राप्त केली असेल तर विशेष अध्यापन पद्धतीचा विषय प्रवेश अर्जात नोंद करताना निवडलेला विषय हा पदवी अभ्यासक्रमातील अनिवार्य / सक्तीचा (Compulsory) विषय असू नये. तो विषय ऐच्छिक (Optional) / विशेष (Special) / दुय्यम (Subsidiary) असावा अथवा पदव्युत्तर पदवीला तो विषय अभ्यासलेला असावा. विशेष अध्यापन पद्धतीसाठी (Special Method) निवडावयाचा विषय हा शालेय / उच्च माध्यमिक स्तरावरील विषयांपैकी एक असावा. या विषयाची सोय ज्या अध्यापक महाविद्यालयात आहे, त्या अध्यापक महाविद्यालयात तो प्रवेशास पात्र राहील.

ब) जर एखादा उमेदवार एकापेक्षा अधिक विशेष अध्यापन पद्धतीसाठी पात्र व इच्छुक असेल तर अशा उमेदवाराने पात्र अध्यापन पद्धतीसाठी अर्जातील सूचनेप्रमाणे नोंद करणे आवश्यक आहे. उमेदवाराने अध्यापन पद्धतीसाठीचा विषय पदवीस्तरावर ऐच्छिक (Optional) /विशेष (Special)/दुय्यम (Subsidiary) म्हणून अभ्यासलेला असावा. अनिवार्य/ सक्तीचा (Compulsory) विषय विशेष अध्यापन पद्धतीसाठी निवडता येणार नाही.

क) उमेदवाराने अतिरिक्त विषय घेऊन अतिरिक्त पदवी प्राप्त केली असेल तर उपरोक्त ६.१ (ब) या नियमाप्रमाणे तो विषय अध्यापन पद्धती निवडण्यास पात्र राहील, परंतु गुणवत्तेसाठी त्याचे प्रथम पदवीचे मूळ गुण ग्राह्य धरले जातील.

ड) केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट असणाऱ्या महाविद्यालयाबाबतची प्रवेशक्षमता, माध्यम, अध्यापन पद्धती व शिक्षण शुल्क इत्यादी माहिती महाविद्यालयाचा प्राधान्यक्रम भरतेवेळी उमेदवारांना संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

### ६.२ शालेय विषयाशिवाय इतर विषयातील पदवी :

अ) शालेय विषयातील पदवीधर सोडून इतर शाखेच्या पदवीधरांनी प्रवेश अर्जात अध्यापन पद्धतीऐवजी आपल्या विद्याशाखेची नोंद करावी. संबंधित अध्यापन पद्धती सर्व महाविद्यालयात उपलब्ध नाहीत, परंतु ७.१ अ, ब, क आणि ड नुसार सर्व महाविद्यालयात संबंधित विषयांसाठी जागा राखीव आहेत. त्यामुळे गुणवत्तेनुसार प्रवेशित उमेदवाराला अशा महाविद्यालयात आपल्या विषयाची अध्यापन पद्धती मागण्याचा अधिकार असणार नाही. यास्तव जर उमेदवाराला आपल्या विद्याशाखेची निवड अध्यापन पद्धतीसाठी करावयाची असेल तर उमेदवाराने ज्या अध्यापक महाविद्यालयात आपला विषय आहे त्याच महाविद्यालयाचा प्राधान्यक्रम द्यावा.

ब) केंद्रीय प्रवेश पद्धतीनुसार वरील विद्याशाखांच्या उमेदवारांना ज्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्रवेश मिळेल त्या महाविद्यालयाचे प्राचार्य संबंधित उमेदवारास महाविद्यालयात उपलब्ध अध्यापन पद्धतींपैकी पदवी स्तरावरील विषयांशी सुसंगत अध्यापन पद्धती १ व २ निश्चित करतील. उदा., आय.टी./कृषी/संगणक या विषयांची अध्यापन पद्धती उपलब्ध नसल्यास अशा विद्यार्थ्यांना विज्ञान/गणित हे विषय घ्यावे लागतील.

क) प्रथम अध्यापन पद्धतीसाठी सोय असलेल्या प्रत्येक विषयासाठी माध्यमनिहाय, विषयनिहाय, संवर्गनिहाय, टक्केवारीनुसार एकूण उपलब्ध जागा विचारात घेऊन खालील प्रमाणे प्रवेश दिले जातील :

१) प्रथम पदवी प्राप्त केलेल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी ७० टक्के जागा.

२) प्रथम पदवी प्राप्त केलेले विद्यापीठ सोडून महाराष्ट्रातील इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी २८ टक्के जागा.

३) महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठातून प्रथम पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांसाठी २ टक्के जागा.

४) हे विभाजन दुसऱ्या फेरीपर्यंत राहील.

प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीनंतर जागा शिल्लक राहिल्यास संबंधित अध्यापक महाविद्यालयाला प्राप्त झालेल्या राज्यस्तरीय गुणवत्ता यादीतून गुणवत्तेनुसार विषयनिहाय/संवर्गनिहाय प्रवेश दिले जातील. महाविद्यालयातील गुणवत्ता यादीतून ७० टक्के, २८ टक्के व २ टक्के याचा विचार न करता उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या अर्जानुसार विषयनिहाय/संवर्गनिहाय एकत्रित गुणवत्ता यादी केली जाईल व त्या यादीनुसार प्रवेश दिले जातील. एखाद्या विषयाचे किंवा संवर्गाचे पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास नियम क्र. २१.५, २१.६ व २१.७ या नियमांनुसार अदलाबदल करून रिक्त जागा भरण्यात येतील व त्यासाठीचे वेळापत्रक आवश्यकतेनुसार स्वतंत्रपणे वेबसाईट व वर्तमानपत्रे यामधून प्रसिद्ध केले जाईल.

**टीप : केंद्रीय प्रवशेपद्धतीद्वारे बी.एड. प्रवेश होत असल्यामुळे केंद्रीय बी.एड. प्रवेशाचे नियम राज्यातील सर्व विद्यापीठांना लागू राहतील.**

## ७. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील जागांची विभागणी :

७.१ विद्याशाखानिहाय / विषयनिहाय जागांची विभागणी :

अ. **मानव्य शास्त्र -**

| | |
|---|---|
| १) इंग्रजी अध्यापन पद्धती | १५ टक्के |
| २) मराठी अध्यापन पद्धती | १५ टक्के |
| ३) हिंदी अध्यापन पद्धती | १० टक्के |
| | **४० टक्के** |

**(ज्या महाविद्यालयात तीनपेक्षा अधिक भाषा असतील तेथील जागांचे विभाजन महाविद्यालयामध्ये उपलब्ध सर्व भाषा अध्यापन पद्धतीमध्ये समान राहील.)**

ब. **शास्त्र शाखा -**

| | |
|---|---|
| १) शास्त्र अध्यापन पद्धती | १५ टक्के |
| २) गणित अध्यापन पद्धती | १० टक्के |
| ३) संगणक/माहिती तंत्रज्ञान/अभियांत्रिकी | ०५ टक्के |
| | **३० टक्के** |

| | |
|---|---|
| क. **वाणिज्य /व्यवस्थापन/विधी शाखा एकूण -** | ३ टक्के |
| कृषि शास्त्र / वैद्यकीय शास्त्र | २ टक्के |
| | **५ टक्के** |

ड. **सामाजिक शास्त्रे**

| | |
|---|---|
| १) इतिहास अध्यापन पद्धती | १० टक्के |
| २) भूगोल अध्यापन पद्धती | १० टक्के |
| ३) सामाजिक शास्त्रे | ०५ टक्के |

**(७.१ मधील अ, ब, क तसेच ड मधील १ व २ या विद्याशाखा सोडून इतर सर्व विद्याशाखा)**

**टीप : ज्या महाविद्यालयात दोनपेक्षा अधिक सामाजिकशास्त्र अध्यापन पद्धती असतील त्या ठिकाणी उपलब्ध सर्व समाजशास्त्र अध्यापन पद्धतीमध्ये उपलब्ध जागांचे विभाजन समान राहील.**

| | |
|---|---|
| | **२५ टक्के** |
| **एकूण टक्के (अ+ब+क+ड)** | **१०० टक्के** |

७.२ **विद्यापीठ क्षेत्रनिहाय जागांची विभागणी :**

अ) बी.एड. प्रवेशासाठी प्रत्येक शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील एकूण प्रवेश क्षमतेच्या ७० टक्के जागा संबंधित महाविद्यालय ज्या विद्यापीठ क्षेत्रात येते, त्या विद्यापीठाची प्रथम पदवी संपादन केलेल्या उमेदवारांसाठी राखीव असतील.

ब) प्रत्येक शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या एकूण प्रवेश क्षमतेच्या **२८** टक्के जागांसाठी संबंधित महाविद्यालय ज्या विद्यापीठ क्षेत्रात येते त्या विद्यापीठाचे पदवीधर उमेदवार वगळून महाराष्ट्रातील अन्य सर्व मान्यताप्राप्त विद्यापीठे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक व इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची महाराष्ट्रातील केंद्रे, मौलाना आझाद राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची महाराष्ट्रातील केंद्रे येथून पदवी संपादन केलेल्या उमेदवारांसाठी राखीव असतील.

क) सैन्य दलातील सक्रिय असलेले आजी (ॲक्टिव्ह सर्व्हिसेस)/अधिकारी व कर्मचारी तसेच माजी सैनिकांची मुले/मुली/पती/पत्नी व स्वतः माजी सैनिक यांच्यासाठी राखीव जागेवर महाराष्ट्र राज्यात सेवेत असलेल्या तसेच महाराष्ट्रातील रहिवासी असलेल्या परंतु राज्याबाहेर सैन्य दलात नोकरीत असलेल्या अधिकारी/सैनिक/कर्मचारी यांची मुले/मुली/पती/पत्नी यांनी इतर राज्यातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण केली आहे, असे उमेदवार उपरोक्त (ब) मधील **२८** टक्क्यांमधील २ टक्के राखीव असलेल्या जागांवर प्रवेशास पात्र राहतील.

ड) शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या एकूण प्रवेशक्षमतेच्या **२** टक्के जागा महाराष्ट्राबाहेरील मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवीधरांसाठी तसेच ७.२ ब मधील मुक्त विद्यापीठांची महाराष्ट्रातील केंद्रे वगळून महाराष्ट्राबाहेरील केंद्रातील पदवीधरांसाठी राहतील. या जागेसाठी सर्व उमेदवार खुल्या गटातील समजण्यात येतील. त्यांना माध्यमाची व विषयाची प्रवेश नियमावलीतील अट पूर्ण करणे बंधनकारक राहील.

इ) **३० (२८ + २)** टक्के जागांसाठी विद्यापीठांबाहेरील उमेदवारांचे पुरेसे अर्ज न आल्यास उर्वरित जागा संबंधित महाविद्यालयाच्या विद्यापीठ क्षेत्रातील **७०** टक्के कोट्याच्या प्रतीक्षा यादीतील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

फ) १) उर्दू व गुजराथी माध्यमाच्या अध्यापन पद्धती असलेल्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील **७०** टक्के जागा त्याच विद्यापीठ क्षेत्रातील उमेदवारांमधून भरण्यात येतील व **३०** टक्के जागा राज्यातील अन्य विद्यापीठ क्षेत्रातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

२) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठ क्षेत्रातील उर्दू माध्यमाचे विद्यार्थी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठाच्या उर्दू माध्यमाच्या महाविद्यालयात ७० टक्के जागांवर प्रवेशासाठी पात्र राहतील. उर्वरित २८ टक्के जागा राज्यातील अन्य विद्यापीठ क्षेत्रातील व २ टक्के जागा राज्याबाहेरील विद्यापीठाच्या उमेदवारांतून भरण्यात येतील. त्यानंतर काही जागा शिल्लक राहिल्यास त्याच विद्यापीठाच्या क्षेत्रातील प्रतीक्षा यादीतील उमेदवारांमधून भरण्यात येतील.

३) महाराष्ट्रातील उर्दू व गुजराथी माध्यमासाठी/अध्यापन पद्धतीसाठी पुरेसे उमेदवार प्रवेशासाठी उपलब्ध न झाल्यास रिक्त जागांवर अन्य राज्यातील उमेदवारांचा गुणवत्तेनुसार विचार करण्यात येईल.

ग) काश्मिरी विस्थापितांसाठी शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक : टीईएम ८०९६/(७१८८)/टीई १, दिनांक २४ जून, १९९६ अनुसार प्रत्येक शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रत्येक मंजूर तुकडीकरिता अधिकची १ जागा प्रवेशासाठी दिली जाईल.

**७.३ इंग्रजी/उर्दू/हिंदी/मराठी/गुजराती माध्यमात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी विशेष सूचना :**

१) इंग्रजी/उर्दू/हिंदी/मराठी/गुजराथी माध्यमात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांचे शालेय शिक्षण/उच्च माध्यमिक/पदवी/पदव्युत्तर स्तरावरील शिक्षण त्या त्या माध्यमातून होणे आवश्यक आहे, अथवा उमेदवाराने पदवीस्तरावर ती भाषा अभ्यासलेली असावी. उमेदवाराने ज्या माध्यमाच्या महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे त्याला त्याच माध्यमात सरावपाठ घ्यावे लागतील.

२) इंग्रजी माध्यमात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांची **CET** सोबत ५० गुणांची इंग्रजी भाषा ज्ञान चाचणी घेतली जाईल. या चाचणीत जे उमेदवार किमान **३६** टक्के गुण प्राप्त करतील, तेच इंग्रजी माध्यमाच्या महाविद्यालयांमध्ये प्रवेशास पात्र राहतील. इंग्रजी भाषाज्ञान चाचणी प्रश्नपत्रिकेचा अभ्यासक्रम व भारांश पुढे दिल्यानुसार असेल :

| Sr. No. | Syllabus Content | Weightage |
|---|---|---|
| 1) | Reading Comprehension : Picture, Poetry, Prose & Dialogue | 40% |
| 2) | Vocabulary Focus - Spellings, Antonyms, Synonyms, Homonyms | 10% |
| 3) | Grammar Focus - a) Punctuation, b) Articles, c) Prepositions, d) Conjunctions, e) Degree of Adjectives | 16% |
| 4) | Sentence Formation : a) Conversion of sentences from Affirmative-Negative, Interrogative - Assertive - Exclamatory, b) Jumbled sentences, c) Identifying errors in sentences. | 14% |
| 5) | Phonetics :- i) Phonetic transcription, ii) Accent, iii) Intonation Pattern | 06% |
| 6) | Verbal Idoms and Proverbs | 10% |
| 7) | Figures of Speech | 04% |
| | **Total** | **100%** |

## ८. वेगवेगळ्या घटकांसाठी राखीव जागा (आरक्षण) :

८.१ बी.एड्. अभ्यासक्रमासाठी ७० टक्के व ३० टक्के जागांवर प्रवेश देताना शासनाच्या आरक्षणासंबंधीच्या प्रचलित धोरणानुसार एकूण प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के जागा महाराष्ट्रातील मागासवर्गीय घटकांसाठी राखीव असून त्यांचे संवर्गनिहाय आरक्षणाचे प्रमाण पुढीलप्रमाणे राहील :

| क्र. | संवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती व अनुसूचित जातीमधील बौद्ध धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती **(S.C)** | १३ |
| २ | अनुसूचित जमाती **(S.T.)** | ७ |
| ३ | विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) **(VJ/DT)** (अ) | ३ |
| ४ | भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) **(N.T.१)** (ब) | २.५ |
| ५ | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) **(N.T.२)** (क) | ३.५ |
| ६ | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) **(N.T.३)** (ड) | २ |
| ७ | इतर मागासवर्गीय **(OBC)** | १९ |
| | **एकूण** | ५० |

८.२ अ) प्रचलित शासन निर्णयानुसार ज्या जातींना नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र किंवा जात पडताळणी दाखला आवश्यक आहे, त्यांनी त्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती अंतिम प्रवेशाच्यावेळी मूळ प्रमाणपत्रासह सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा संबंधित उमेदवाराचा समावेश खुल्या संवर्गात करण्यात येईल व त्याचा खुल्या संवर्गानुसार पुढील फेरीत पात्रतेनुसार प्रवेशासाठी विचार करण्यात येईल.

ब) **नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र हे शासनाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या निर्णयानुसार असणे अनिवार्य आहे.**

क) शासनाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या शासन निर्णयानुसार समावेश करण्यात आलेल्या संवर्गानिहाय जाती, उपजाती तसेच संवर्गबदल त्या त्या निर्णयानुसार आरक्षणासाठी पात्र राहतील.

**टीप : १) घटनात्मक आरक्षण महाराष्ट्रातील निवासी उमेदवारास लागू राहील.**

**२) महाराष्ट्र राज्याच्या व्यतिरिक्त इतर राज्याचे असलेल्या किंवा इतर राज्याचे म्हणून महाराष्ट्र राज्यातून जातीचे प्रमाणपत्र घेतलेल्या उमेदवारांना ८.१ प्रमाणे घटनात्मक आरक्षण मिळणार नाही. तसेच ५.१ प्रमाणे लाभ मिळणार नाहीत.**

**३) आरक्षणाच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.**

८.३ **विशेष मागास प्रवर्गाबाबतची (S.B.C.) तरतूद :**
महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. टीईएम/३३९७/१२९२६/(९०८६)/तांशि-१, दि. ११ जुलै, १९९७ च्या शासन निर्णयानुसार आरक्षित जागा एकूण ५० टक्के करण्यात आल्या. या शासन निर्णयाच्या तरतुदीनुसारः

(१) विशेष मागास प्रवर्गात ज्या जाती आहेत, त्यापैकी काही जाती इतर मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट होत्या. त्यामुळे सुरुवातीस विशेष मागास प्रवर्गांचे प्रमाणपत्रधारक उमेदवारांची जात ज्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होती त्या मागास प्रवर्गांच्या आरक्षणासाठी पात्र समजण्यात येईल.

(२) गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीतजास्त २ टक्के पर्यंत विशेष मागासवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल.

(३) यासंबंधी नॉन-क्रिमिलेअरबाबत वेळोवेळी प्रसिद्ध झालेले न्यायालयाचे व शासनाचे निर्णय लागू राहतील.

८.४ खुल्या प्रवर्गाच्या ५० टक्के जागा व राखीव प्रवर्गाच्या ५० टक्के जागा यांच्या अंतर्गत खालील उमेदवारांना त्या समोर दर्शविल्याप्रमाणे स्वतंत्रपणे आरक्षण राहील.

अ) जिल्हा शल्य चिकित्सक यांनी किमान ४० टक्के शारीरिकदृष्ट्या अपंग असल्याचे प्रमाणपत्र दिलेले उमेदवार - ३ टक्के

ब) सैन्य दलातील सक्रिय सेवेत असलेले (ॲक्टिव्ह सर्व्हिस) कर्मचारी व माजी सैनिक यांची मुले/मुली व पती/पत्नी व स्वतः माजी सैनिक - २ टक्के

**सूचना : हे अंतर्गत आरक्षण असल्यामुळे प्रथम गुणवत्तेनुसार या जागा भरल्या जातील व भरलेल्या जागा ज्या संवर्ग व विषयाच्या असतील त्या संवर्गाच्या व विषयाच्या तेवढ्या जागा नियमित प्रवेशाच्या जागांमधून कमी होतील.**

८.५ सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड्. अभ्यासक्रमासाठी एकूण प्रवेश क्षमतेच्या ३०टक्के जागांचे आरक्षण महिलांसाठी ठेवण्यात आले आहे. (संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. जाईली-१०००/७२३/२०००/मशि-१, दिनांक १७ एप्रिल, २०००.)

घटस्फोटीत/परित्यक्ता/विधवा महिला यांना सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर केल्यास महिलांसाठी असलेल्या ३० टक्के आरक्षणात समान गुणवत्तेच्या तुलनेत प्राधान्य देण्यात येईल. (संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एस.सी.टी./२००२/(१८/०२)/मशि-३, दिनांक २६ फेब्रुवारी, २००२).

८.६ अ) बी.एड. अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी **त्यांच्या जातीची प्रवेश अर्जात नोंद करावी. प्रवेश अर्जात नोंद करताना जर ते शिष्यवृत्तीधारक असतील तर पूर्वीचा शिष्यवृत्ती क्रमांक नोंदवावा.** मात्र अंतिम प्रवेशाच्या वेळी मागासवर्गीय उमेदवारांना मूळ प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य राहील. जातीच्या वैधता प्रमाणपत्र/नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राबाबत शासनाने वेळोवेळी काढलेले निर्णय लागू राहतील.

ब) शासनस्तरावरून वेळोवेळी विविध संवर्गात काही जातींचा संवर्ग बदलला जातो, समावेश केला जातो. अशा बाबींची नोंद योग्य पुराव्यासह उमेदवारांनी सादर करावी.

## ९. प्रवेशासंबंधी सर्वसाधारण नियम :

९.१ मागासवर्गीय उमेदवारांनी प्रवेश अर्जात आपल्या जातीची नोंद करताना जर शिष्यवृत्तीधारक असतील तर पूर्वीचा शिष्यवृत्ती क्रमांक नोंदवावा. तसेच वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या शासन निर्णयानुसार ज्या जातींना जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक आहे, तसेच बिगर उन्नत गटात मोडणाऱ्या उमेदवारांना प्रचलित नियमानुसार बिगर उन्नत गट प्रमाणपत्र (Non Creamy Layer Certificate) आवश्यक आहे, त्याच्या सत्यप्रती अंतिम प्रवेशाच्यावेळी मूळ प्रमाणपत्रासह सादर करणे अनिवार्य राहील. जर त्या उमेदवारांनी प्रवेशाच्यावेळी सदर मूळ प्रमाणपत्र सादर केले नाही तर अशा उमेदवारांना खुल्या संवर्गातील उमेदवार मानण्यात येईल. त्यानुसार पात्रता, गुणवत्ता व शुल्काबाबत कार्यवाही करण्यात येईल.

९.२ प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकानुसार तसेच वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांनुसार उमेदवाराने कार्यवाही करणे ही उमेदवाराची जबाबदारी राहील.

९.३ १) **प्रवेश प्रक्रिया :** प्रवेश प्रक्रिया ही संगणकाच्या साहाय्याने व गुणवत्तेनुसार सरळ प्रवेश पद्धतीने होईल.

२) **संगणकाच्या साहाय्याने सरळ प्रवेश प्रक्रिया :** या पद्धतीत गुणवत्तेनुसार संगणकामार्फत संवर्गनिहाय, विषयनिहाय व माध्यमनिहाय प्रवेश करण्यात येतील. या प्रवेशासाठी समुपदेशनास बोलावले जाणार नाही. प्रवेशासंबंधीची संपूर्ण माहिती

संकेतस्थळावर उपलब्ध असेल. आवश्यकतेनुसार उमेदवारांशी त्यांच्या पत्त्यावर अथवा त्यांनी दिलेल्या दूरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्यात येईल. तेव्हा प्रवेश अर्जावर संपर्क पत्ता/दूरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक योग्य प्रकारे नोंदविणे आवश्यक आहे.

**१०. प्रवेश प्रक्रियेचे टप्पे :**

**१०.१ ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रिया :**

I बी.एड. प्रवेश प्रक्रिया २०१५-१६ साठी प्रवेश अधिसूचनेतील **http://bed.mhpravesh.in** या संकेतस्थळावर जावे.

II प्रवेश प्रक्रियेची नोंदणी सुरू करण्यासाठी (Register Online) रजिस्टर ऑनलाईन या बटणावर क्लिक करावे.

III कृपया फॉर्म इंग्रजी भाषेत भरावा.

IV कृपया स्क्रीनवर दिसणाऱ्या प्रश्नांची उत्तरे दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून द्या. सॉफ्टवेअर आपण दिलेल्या उत्तराप्रमाणे प्राथमिक पात्रता तपासणार आहे.

V जर तुम्ही पात्र असाल तर घोषणा ब्लॉकमधील चेक बॉक्समध्ये क्लिक करा.

VI चेक बॉक्सवर क्लिक केल्यानंतर (I am Eligible, Register me) मी पात्र आहे मला रजिस्टर करा असे बटण दिसेल.

VII नोंदणी पुढे चालू ठेवण्यासाठी त्या बटणावर क्लिक करणे.

VIII आवश्यक असणारी व विचारण्यात आलेली माहिती ऑनलाईन नोंदणी फॉर्ममध्ये भरावी.

**११. प्रवेश शुल्क भरण्याची माध्यमे व कार्यपद्धती :**

**११.१ प्रवेश शुल्क ऑनलाईन (नेट बँकिंग/क्रेडीट कार्ड/डेबिट कार्ड) पद्धतीने किंवा एस. बी. आय. बँकेच्या चलनाद्वारे स्वीकारण्यात येईल.**

i आवश्यक ती माहिती भरल्यानंतर सिस्टिम लॉगिन आयडी दर्शविल, पासवर्ड आणि एस.बी.आय. चलन/ए.एल.सी. चलन स्क्रीनवर दिसेल. आपल्याला लॉगिन आयडी आणि पासवर्ड एसएमएसद्वारेही मिळेल. (कृपया त्यासाठी आपला अचूक मोबाईल नंबर द्या) हा लॉगिन आयडीच तुमचा फॉर्म नंबर असेल.(एसएमएस सुविधा ही उमेदवारांना देण्यात येणारी अतिरिक्त सुविधा असेल. जर कोणत्याही उमेदवारास एसएमएस मिळाला नाही तर त्यासाठी प्रवेश प्रक्रिया करणारी एजन्सी जबाबदार राहणार नाही.)

ii Print My Log in Details & Challan details माझे लॉगिन विवरण आणि विवरण चलन प्रिंट या बटणावर क्लिक करून लॉगिन विवरण आणि चलन यांची प्रिंट घ्यावी.

iii उमेदवाराने नोंदणीच्या २ तासानंतर किंवा दुसऱ्या कामकाजाच्या दिवशी एस.बी.आय. बँकेत जावे. बँकेत जाताना सोबत बँकेचे पूर्णपणे भरलेले चलन घेऊन जावे. अर्जाची फी तसेच बँक चार्जेस रोख भरल्यानंतर बँक आपणास फी स्वीकारल्याबद्दलची उमेदवाराचे चलन प्रतीवर पोहोच देईल.

iv उमेदवार नेटबँकींग/क्रेडीट कार्ड/डेबिट कार्ड या माध्यमांमार्फतही ऑनलाईन शुल्क भरू शकतात.

v जाहिरातीत उल्लेख केलेल्या अंतिम तारखेच्या अगोदर विहित शुल्क भरावे. एकदा भरलेली फी परत केली जाणार नाही.

vi भारतीय स्टेट बँकेत किंवा नेट बँकिंगच्या स्वरूपात शुल्क भरल्यास साधारणतः कार्यालयीन कामकाजाच्या एक दिवसानंतर आपण त्याबाबतची पडताळणी करू शकता.

vii जर आपण क्रेडीट कार्ड/डेबिट कार्ड या मध्यमातून शुल्क भरले असेल तर ते पडताळण्यासाठी साधारणतः कार्यालयीन कामकाजाचे दोन दिवसांचा कालावधी लागतो.

वेबसाईटवर प्रवेश शुल्क भरण्याची माहिती आपल्या लॉगिन आयडी आणि पासवर्डचा उपयोग करून पाहू शकता. प्रवेश शुल्क प्राप्त झाल्यानंतर आपणास एसएमएसवरदेखील माहिती मिळू शकेल.

**११.२ प्रवेश शुल्क भरल्यानंतरची ऑनलाईन अर्ज प्रक्रिया :**

i प्रवेश शुल्क भरल्याचा एसएमएस प्राप्त झाल्यानंतर वेबसाईटवर लॉगिन करून Fill Application Form आवेदन पत्र भरण्यासाठी फॉर्म या लिंकवर क्लिक करा.

ii अर्जामध्ये खालील माहिती भरणे आवश्यक आहे : (१) व्यक्तिगत माहिती, (२) संपर्काबद्दल माहिती, (३) आरक्षणाबाबत माहिती, (४) फोटो आणि सहीची स्कॅन कॉपी अपलोड करणे, (५) शैक्षणिक अर्हता, (६) इतर आवश्यक माहिती.

iii वरील दिलेली सर्व माहिती पुरविल्याशिवाय अर्जाची पूर्तता होणार नाही.

iv पूर्ण आवेदनपत्र भरल्यानंतर आवेदन भरल्याबद्दलची मान्यता द्या.

v आपल्या माहितीसाठी फॉर्मची प्रिंटआऊट घ्यावी.

**टीप :** १) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण किंवा प्रवेश प्रक्रिया पार पाडणाऱ्या एजन्सीकडे आवेदन पत्राची प्रिंटआऊट पाठविण्याची आवश्यकता नाही.

२) प्रवेश अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वेळोवेळी देण्यात येणाऱ्या माहितीसाठी वेबसाईट नियमित पाहावी.

३) लेखी परीक्षेसाठी प्रवेशपत्र, सीईटी मार्कशीट (CET Mark-sheet), प्राधान्यक्रम अर्ज भरणे, तसेच प्रवेशानंतर तात्पुरते प्रवेशपत्र काढण्यासाठी वर्तमानपत्रात व वेबसाईटवर दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी. यासंबंधी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४) अपूर्ण भरलेल्या प्रवेश अर्जासाठी उच्च शिक्षण संचालनालय जबाबदार राहणार नाही.

११.३ सामाईक प्रवेश परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांनी वेळापत्रकात नमूद केल्याप्रमाणे ऑनलाईन महाविद्यालयाचा प्राधान्यक्रम अर्ज तसेच शैक्षणिक अर्हता गुण व सीईटी गुण भरावेत.

## १२. गुणवत्ता यादीतील क्रम ठरविण्याची पद्धती :

सामाईक प्रवेश-परीक्षेनंतर पात्र उमेदवारांच्या गुणवत्ता यादीसाठी गुणवत्ता क्रम ठरविण्यासाठी उमेदवाराने मिळविलेल्या गुणांचा विचार पुढीलप्रमाणे करण्यात येईल :

अ) १) या पुस्तिकेतील नियम क्र. २.१(अ) नुसार प्राप्त गुण आणि नियम २.१(क) नुसार प्राप्त अतिरिक्त गुणांची बेरीज करून उमेदवारास प्राप्त झालेल्या गुणांकांचे ५०% गुण.

२) जो उमेदवार पदव्युत्तर गुणांमुळे पात्र ठरला आहे, त्याची गुणवत्ता पदवीला प्राप्त गुण धरून १२(अ)(१) प्रमाणे गणना

ब) सामाईक प्रवेश परीक्षेत उमेदवाराने प्राप्त केलेले गुण.

क) उमेदवाराने १२(अ) (१) / १२(अ)(२) आणि १२(ब) गटात प्राप्त केलेल्या गुणांची बेरीज करून येणाऱ्या गुणांकानुसार उमेदवाराचा गुणवत्ता क्रम ठरविला जाईल.

## १३. गुणवत्ता यादी :

१३.१ सर्व प्रवेश पात्र अर्जांची गुणवत्ता यादी ७० टक्के, २८ टक्केसाठी माध्यमनिहाय/विषयनिहाय/संवर्गनिहाय तसेच अंतर्गत आरक्षणासाठी (आजी/माजी सैनिक व अपंग) तसेच २ टक्केसाठी आणि काश्मिर विस्थापितांसाठी स्वतंत्र गुणवत्ता याद्या तयार करण्यात येतील.

गुणवत्ता यादीतील माहिती आपणांस जाहिरातीतील वेबसाईटवर उपलब्ध होऊ शकेल.

१३.२ गुणवत्ता यादीत जर समान गुण असतील तर प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी खालील पद्धतीचा अवलंब केला जाईल :

१) प्रथम सी.ई.टी. गुणांचे आधिक्य, हेही जर समान असतील तर,
२) पदवी स्तरावरील निव्वळ गुणांचे आधिक्य, हेही जर समान असतील तर,
३) क्रमशः तृतीय, द्वितीय व प्रथम वर्षाच्या गुणांचे आधिक्य, हेही समान असतील तर,
४) वयामधील ज्येष्ठता.

## १४. महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम देणे :

अ) उमेदवाराला एकदाच प्राधान्यक्रम अर्ज भरता येईल.

ब) उमेदवाराला एका वेळी जास्तीतजास्त १०० अध्यापक महाविद्यालयांचा प्राधान्यक्रम देता येईल.

क) उमेदवाराला जर प्राधान्यक्रमात बदल करावयाचा असेल तर तो बदल दोन फेऱ्यांच्या वेळापत्रकात दिलेल्या मधल्या कालावधीमध्ये करता येईल; परंतु प्राधान्यक्रम दिलेल्या महाविद्यालयांची संख्या १०० पेक्षा जास्त असणार नाही.

## १५. महाविद्यालयाचा प्राधान्यक्रम भरण्याची पद्धती :

१५.१ हा अर्ज भरत असताना ज्या महाविद्यालयात उमेदवाराला प्रवेश घ्यावयाचा आहे, अशा महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम भरावेत.

१५.२ महाविद्यालयाचा देण्यात आलेला प्राधान्यक्रम व गुणवत्ता यावर प्रवेश आधारित असल्यामुळे महाविद्यालयाचा प्राधान्यक्रम अतिशय काळजीपूर्वक भरावा.

१५.३ महाविद्यालयाचा प्राधान्यक्रम प्रवेशासाठी महत्त्वाचा असल्याने उमेदवाराने पात्र विषय व माध्यमासाठी उपलब्ध असणाऱ्या जास्तीतजास्त १०० अध्यापक महाविद्यालयांसाठी योग्य प्राधान्यक्रम देणे आवश्यक आहे.

१५.४ एक किंवा एकापेक्षा अधिक विषयांसाठी, एकापेक्षा अधिक माध्यमांसाठी, एका महाविद्यालयासाठीचा प्राधान्यक्रम एकच असावा.

१५.५ उमेदवाराला प्रत्येक फेरीनंतर पुढील फेरी सुरू होण्यापूर्वी प्राधान्यक्रमात **वेळापत्रकात दर्शविल्याप्रमाणे** बदल करता येईल. तसेच ज्या उमेदवाराने प्राधान्यक्रम भरले नाहीत त्यांनाही प्राधान्यक्रम अर्ज भरता येईल.

## १६. प्रवेश अर्जात अध्यापन पद्धती नोंदविण्यासंबंधी सूचना :

१६.१ शास्त्र अध्यापनाच्या प्रवेशासाठी भौतिक / रसायन / जीवशास्त्र यांच्या स्वतंत्र तसेच एकत्रित गुणवत्ता याद्या तयार केल्या जातील. ज्या विद्यापीठांमध्ये भौतिक / रसायन / जीवशास्त्र या विषयांच्या स्वतंत्र पद्धती आहेत तेथे त्या स्वतंत्र याद्या वापरल्या जातील व ज्या विद्यापीठात शास्त्र विषयाच्या (Science) सर्व शाखा शास्त्र अध्यापन पद्धतीत येतात तेथे एकत्रित गुणवत्तायादीतून प्रवेश दिला जाईल. तेव्हा शास्त्र विषयाच्या उमेदवारांनी आपल्या विशेष विषयांबरोबरच शास्त्र अध्यापन पद्धतीवरही खूण करावी.

१६.२ गणित अध्यापन पद्धतीसाठी फक्त बी.एस्सी. गणित / सांख्यिकी विषय असलेले उमेदवार पात्र राहतील. बी. ए. गणित पदवीधारक उमेदवारांनी मात्र सामाजिकशास्त्र अध्यापन पद्धतीसाठी खूण करावी.

१६.३ अ) **विज्ञान व गणित विद्या शाखा सोडून इतर सर्व शास्त्र शाखेच्या आपल्या पदवीच्या विषयानुसार असलेल्या विद्याशाखेसमोर खूण करावी.**

ब) ज्या विद्यापीठात होम सायन्स अध्यापन पद्धती आहे तेथे विज्ञान/कला/कृषी या विद्याशाखेतील होम सायन्सचे उमेदवार पात्र राहतील. त्यामुळे संबंधित उमेदवाराने १ च्या सूचनेप्रमाणे संबंधित विद्याशाखेसमोरच्या खुणेबरोबरच गृह विज्ञान (Home Science) या अध्यापन पद्धतीसमोरही खूण करावी. (उदा., नागपूर विद्यापीठातील महाविद्यालये)

१६.४ अ) इतिहास/भूगोल या विषयांसाठी स्वतंत्र खूण करावी. या विषयांच्या उमेदवाराने नंतर सामाजिक शास्त्रे यावर खूण करू नये.

ब) अर्थशास्त्र / राज्यशास्त्र / संगीत / गृह विज्ञान / पाली / गुजराती / सिंधी / गृह अर्थशास्त्र / संस्कृत हे विषय काही महाविद्यालयात आहेत. ज्यांना त्याच महाविद्यालयात प्रवेश हवा असेल त्यांनी त्या महाविद्यालयांचा प्राधान्यक्रम द्यावा. ज्या महाविद्यालयात हे विषय नाहीत त्या महाविद्यालयाचा प्राधान्यक्रम द्यावयाचा असेल तर सामाजिक शास्त्रे या विषयावर खूण करावी.

क) नियम क्रमांक ६.१ मधील अ, ब, क आणि ड या विद्याशाखा सोडून इतर सर्व विद्याशाखेच्या उमेदवारांनी सामाजिक शास्त्रे या पद्धतीसमोर खूण करावी.

१६.५ उमेदवारांचा पदवीचा, बी.एड. प्रवेशासाठीचा पात्र-विषय प्रवेश अर्जातील अध्यापन पद्धतीत दर्शविला असेल तर संबंधित उमेदवाराने त्यासमोर खूण करावी.

१६.६ प्रवेश अर्जातील माध्यम व पद्धती भरण्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवारांची आहे. अर्जात भरलेल्या चुकीच्या किंवा अपूर्ण माहितीस उमेदवार स्वतः जबाबदार राहील. अपूर्ण माहितीमुळे उमेदवाराचा अर्ज स्वीकारला गेला नाही तर त्यासाठी उमेदवार स्वतः जबाबदार राहील.

## १७. प्रवेश फेऱ्या :

१७.१ प्रवेशासाठी खालील प्रमाणे ऑनलाईन फेऱ्या घेण्यात येतील :

**प्रथम फेरी :** शासकीय/अनुदानित/केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये.

**दुसरी फेरी :** शासकीय/अनुदानित/केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये.

१७.२ प्रवेशाच्या दोन फेऱ्यानंतर जागा शिल्लक राहिल्यास संबंधित अध्यापक महाविद्यालयामार्फत राज्यस्तरीय गुणवत्ता यादीतून गुणवत्तेनुसार विषयनिहाय/संवर्गनिहाय प्रवेश दिले जातील व त्यासाठीचे आवश्यक ते वेळापत्रक स्वतंत्रपणे वेबसाईट व वर्तमानपत्रे यांमधून प्रसिद्ध केले जाईल.

१७.३ आवश्यकतेनुसार फेरी कमी जास्त करण्याचे किंवा प्रवेश प्रक्रियेच्या स्वरूपात बदल करण्याचे अधिकार मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे, अध्यक्ष, बी.एड. प्रवेश समिती/सक्षम अधिकारी यांच्याकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

**टीप :** १) केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी झालेल्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची यादी संकेतस्थळावर प्राधान्यक्रम अर्ज भरताना उपलब्ध करून देण्यात येईल. त्यात काही बदल झाल्यास तो वेळोवेळी संकेतस्थळावर दर्शविण्यात येईल.

२) माहिती पुस्तिकेत देण्यात आलेले वेळापत्रक संभाव्य आहे.
३) त्यात बदल झाल्यास तो वेळोवेळी अधिसूचनेतील **http://bed.mhpravesh.in** या वेबसाईटवर व वृत्तपत्रातूनही प्रसिद्ध केला जाईल.
४) प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्या व वेळापत्रकात बदल करण्याचे अधिकार शिक्षण संचालक, उच्च शिक्षण व अध्यक्ष बी.एड. प्रवेशसमिती/सक्षम अधिकारी यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.
५) अपूर्ण भरण्यात आलेला अर्ज स्वीकारण्यात येणार नाही व त्यासाठी उमेदवार जबाबदार राहील.
६) CET परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेची भाषा मराठी व इंग्रजी राहील.
७) संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन राहील.

## १८. अभ्यासक्रमाची शुल्क आकारणी :

### १८.१ शिक्षण शुल्क :

(शासन निर्णय क्र.२००१/ बी.एड./(४४२/०७) /मशि-३, दि. २४ मे, २००२ व शासन निर्णय क्रमांक एसटीसी २००३/बी.एड. प्रवेश (११०/०३)/मशि-३, दि.७ मे २००३नुसार) **२०१५-२०१६** या शैक्षणिक वर्षाकरिता **अंतरिम शिक्षण शुल्क खालील प्रमाणे राहील :**

अ) शासकीय व अनुदानित महाविद्यालयांसाठी : **एकूण (दोन वर्षांचे) रु. १८,८५६/-**

प्रथम वर्ष रु. ९,४२८/-

द्वितीय वर्ष रु. ९,४२८/-

**सदर शुल्कामध्ये शासनाकडून बदल झाल्यास विद्यार्थ्यांना सुधारित शुल्कानुसार फरकाची रक्कम भरावी लागेल.**

ब) विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित अशासकीय महाविद्यालयांसाठी : शिक्षण शुल्क समितीकडून विहित केलेले शुल्क.

क) या शुल्काव्यतिरिक्त विद्यापीठाने इतर शुल्क निर्धारित केल्यास ते शुल्क विद्यापीठीय क्षेत्रात अध्यापक महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भरणे बंधनकारक राहील.

### १८.२ इतर शुल्क :

शासकीय व अनुदानित महाविद्यालयांसाठी शिक्षण शुल्काव्यतिरिक्त प्रथम वर्ष व द्वितीय वर्षासाठी प्रवेश शुल्क, ग्रंथालय शुल्क, जिमखाना शुल्क व प्रयोगशाळा शुल्क पुढीलप्रमाणे आकारण्यात येईल :

| **प्रथम वर्ष** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **खुला प्रवर्ग** | | | **मागासवर्गीय संवर्ग** | | |
| अ) | प्रवेश शुल्क | रु. १००/- | अ) | प्रवेश शुल्क | रु. ----/- |
| ब) | ग्रंथालय शुल्क | रु. १,०००/- | ब) | ग्रंथालय शुल्क | रु. १,०००/- |
| क) | जिमखाना शुल्क | रु. १,०००/- | क) | जिमखाना शुल्क | रु. १,०००/- |
| ड) | प्रयोगशाळा शुल्क | रु. १,०००/- | ड) | प्रयोगशाळा शुल्क | रु. १,०००/- |
| | **एकूण** | **रु. ३,१००/-** | | **एकूण** | **रु. ३,०००/-** |

| **द्वितीय वर्ष** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **खुला प्रवर्ग** | | | **मागासवर्गीय संवर्ग** | | |
| अ) | प्रवेश शुल्क | रु. -----/- | अ) | प्रवेश शुल्क | रु. ----/- |
| ब) | ग्रंथालय शुल्क | रु. ५००/- | ब) | ग्रंथालय शुल्क | रु. ५००/- |
| क) | जिमखाना शुल्क | रु. ५००/- | क) | जिमखाना शुल्क | रु. ५००/- |
| ड) | प्रयोगशाळा शुल्क | रु. ५००/- | ड) | प्रयोगशाळा शुल्क | रु. ५००/- |
| | **एकूण** | **रु. १,५००/-** | | **एकूण** | **रु. १,५००/-** |

१८.३ १) अ) संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. सकक्षं/शिक्षण/भासशि/डी.एड./बी.एड./का-४/२००४-०५/८८४, दिनांक ११-६-२००४ नुसार शासकीय अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ज्या प्रचलित दराने शिष्यवृत्ती/शिक्षण फी देण्यात येते, त्याच प्रचलित दराने कायम विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/शिक्षण फी यांची प्रतिपूर्ती करण्यात येईल. महाराष्ट्र शासनाच्या वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या/होणाऱ्या निर्णयानुसार कायम विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/शिक्षण फीची प्रतिपूर्तता करण्याची कार्यवाही संबंधित महाविद्यालयामार्फत करण्यात येईल.

ब) ज्या विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर प्रवेश घेऊन एक वर्षाचा (एम.ए., एम.एस्सी., एम. कॉम. इत्यादी प्रथम वर्ष) अभ्यासक्रम पूर्ण केला आहे; परंतु पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला नाही असे उमेदवार शिष्यवृत्तीस / शिक्षण फी प्रतिपूर्तीस पात्र राहणार नाहीत.

क) शिष्यवृत्तीधारकाने मागील शिष्यवृत्ती प्राप्त क्रमांक देणे आवश्यक आहे.

ड) मागासवर्गीय विद्यार्थ्याने एका महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर जर तो रद्द करावयाचा असल्यास नियम क्र.२४प्रमाणे मागासवर्गीय उमेदवाराला शुल्क परतावा करावा लागेल.

२) ज्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क मा. शिक्षण शुल्क समितीने निर्धारित केलेले नाही अशा महाविद्यालयांत प्रवेश घेतेवेळी संबंधित विद्यार्थ्यांना मा. शिक्षण शुल्क समितीने ठरवून दिलेली अंतरिम फी (Interim Fee) भरावी लागेल. सदर महाविद्यालयांचे अंतिम शुल्क निश्चित झाल्यावर विद्यार्थ्यांना या महाविद्यालयांची उर्वरित फी भरावी लागेल अथवा ती कमी असल्यास संस्थेस ती विद्यार्थ्यांना परत करावी लागेल व तशा प्रकारचे करार विद्यार्थी व प्राचार्य यांच्यामध्ये प्रवेश घेतेवेळी होणे आवश्यक आहे.

३) महाराष्ट्र शासन/शिक्षण शुल्क समितीने सन २०१५-२०१६ साठी शासकीय/अनुदानित/ कायम विनाअनुदानित महाविद्यालयाच्या शुल्कामध्ये सुधारणा केल्यास ते शुल्क भरणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील.

४) या शुल्काव्यतिरिक्त विद्यापीठाने इतर शुल्क निर्धारित केल्यास ते शुल्क त्या त्या विद्यापीठीय क्षेत्रातील अध्यापक महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भरणे आवश्यक आहे.

## १९. तात्पुरता प्रवेश :

१९.१ उमेदवाराने अर्जात नमूद केलेल्या गुणवत्तेनुसार व त्याने दिलेल्या महाविद्यालयाच्या प्राधान्यक्रमानुसार माध्यमवार, विषयवार, संवर्गनिहाय उपलब्ध जागेवर केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारा तात्पुरता प्रवेश दिला जाईल. वेळापत्रकानुसार तात्पुरत्या प्रवेशित उमेदवारांची यादी वेबसाईटला प्रसिद्ध केली जाईल. ज्या उमेदवारांना तात्पुरता प्रवेश मिळाला आहे अशा उमेदवारांनी ऑनलाईन तात्पुरते प्रवेशपत्र प्राप्त करून घ्यावे.

१९.२ तात्पुरत्या प्रवेशित उमेदवाराने संबंधित महाविद्यालयात वेळापत्रकानुसार तात्पुरते प्रवेशपत्र व सर्व मूळ प्रमाणपत्रांसह उपस्थित राहावे. तात्पुरत्या प्रवेशित उमेदवाराचा प्रवेश, उमेदवाराने अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे देण्यात येतो. या अर्जाची पडताळणी केंद्रीय प्रवेश समितीमार्फत करण्यात येत नाही. महाविद्यालयामार्फत उमेदवाराने सादर केलेल्या मूळ प्रमाणपत्रांच्या आधारे त्याची प्रवेश पात्रता/ गुणवत्ता / संवर्ग / विषय / माध्यम/विद्यापीठ पात्रता याची तपासणी केली जाईल. मात्र त्यात काही त्रुटी आढळल्यास महाविद्यालयामार्फत प्रवेश रद्द केला जाईल. सर्व प्रमाणपत्रांची छाननी करून प्रवेश अंतिम करण्याची जबाबदारी सर्वस्वी महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. तपासणीअंती पात्र उमेदवाराचा प्रवेश उमेदवाराने संबंधित महाविद्यालयाचे शुल्क भरल्यानंतर अंतिम केला जाईल. उमेदवाराच्या प्रवेशानंतर काही अपात्रता निदर्शनास आल्यास त्यास संबंधित अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य जबाबदार राहतील.

१९.३ केंद्रीय बी.एड. प्रवेशाचे वेळापत्रक अधिसूचनेबरोबर प्रसिद्ध करण्यात येईल, तसेच वेबसाईटवर देण्यात येईल. वेळापत्रकात काही बदल असल्यास तो वेळोवेळी संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात जाहीर केला जाईल.

१९.४ विहित मुदतीत प्रवेशित उमेदवार संबंधित महाविद्यालयात उपस्थित न झाल्यास दिलेला तात्पुरता प्रवेश आपोआप रद्द होईल व सदर प्रवेशावर विद्यार्थ्यांचा कोणताही अधिकार असणार नाही.

## २०. महाविद्यालयात प्रवेश घेताना संबंधित विद्यार्थी व महाविद्यालय यांनी घ्यावयाची दक्षता :

२०.१ उमेदवाराने भरलेला प्रवेश अर्ज केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारा तपासला जात नाही. प्रवेश मिळाल्यानंतर महाविद्यालयामार्फत सर्व प्रमाणपत्रांची छाननी होते व त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास प्राचार्यांमार्फत प्रवेश रद्द केला जाईल. त्यामुळे उमेदवाराने प्रवेश

अर्जात योग्य व सत्य माहिती भरणे ही सर्वस्वी उमेदवाराची जबाबदारी असून चुकीची माहिती भरल्यामुळे प्रवेश रद्द झाल्यास त्यासाठी संबंधित उमेदवारच जबाबदार राहील.

२०.२ प्रवेश अर्ज भरताना उमेदवाराने नमूद केलेली गुणवत्तेसंबंधीची व प्रमाणपत्रांसबंधीची माहिती अंतिम राहील. यात प्रवेश अर्ज भरल्यानंतर कोणताही बदल करता येणार नाही.

२०.३ उमेदवाराने ७० टक्के/२८ टक्के/२ टक्के कोटा यापैकी प्रवेशासाठी पात्र असणाऱ्या कोट्यासमोर खूण करावी.

२०.४ उमेदवाराने प्रत्येक पात्र अध्यापन पद्धतीची स्वतंत्र नोंद करावी. तसेच पात्र माध्यमांचा प्राधान्यक्रम द्यावा.

२०.५ प्राधान्यक्रम अर्ज भरताना उमेदवाराने धारण केलेली अर्हता ही अंतिम राहील व त्यावरून गुणवत्ता निश्चित केली जाईल. अर्ज भरल्यानंतर उमेदवाराने धारण केलेल्या अर्हतेमुळे किंवा सादर केलेल्या गुणवत्तेमध्ये बदल केला जाणार नाही.

२०.६ एकाच वेळी उमेदवाराला एकापेक्षा अधिक महाविद्यालयात प्रवेश घेता येणार नाही. अशाप्रकारे प्रवेश घेणाऱ्या उमेदवारास प्रवेश प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

**विशेष सूचना :**

I. उमेदवाराने ऑनलाईन भरलेली माहिती केंद्रीय प्रवेश समितीमार्फत तपासली जात नाही.

II. उमेदवारांनी भरलेली माहिती व त्यांनी दर्शविलेल्या गुणांच्या आधारे निश्चित झालेल्या गुणवत्तेनुसार तात्पुरता प्रवेश झाल्यानंतर प्रवेशित महाविद्यालयांमार्फत ही माहिती तपासली जाईल.

III. उमेदवाराने भरलेल्या माहितीच्या आधारे व त्याने दर्शविलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार प्रवेश दिले जातात. महाविद्यालयात प्रवेश अंतिम करताना उमेदवाराने अर्जात नमूद केलेल्या माहितीनुसार पात्रता/गुणात किंवा इतर बाबींमध्ये काही त्रुटी/उणिवा/चूका आढळल्यामुळे प्रवेश रद्द झाल्यास ही सर्वस्वी उमेदवाराची जबाबदारी राहील.

## २१ शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या निश्चितीबाबत :

२१.१ उमेदवारांची गुणवत्ता, विविध अध्यापन पद्धतीसाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील जागांची उपलब्धता, माध्यम व इतर बाबी विचारात घेऊन गुणवत्तेनुसार उमेदवाराने दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार महाविद्यालयात संगणकामार्फत तात्पुरता प्रवेश दिला जाईल.

२१.२ उमेदवाराचा तात्पुरता प्रवेश निश्चित करीत असताना प्रथम सामान्य गुणवत्ता यादीतून (General Merit List) जागा भरण्यात येतील. त्यानंतर मागासवर्गीय संवर्गाच्या जागा भरल्या जातील. मागासवर्गीय उमेदवार सामान्य गुणवत्ता यादीतून (General Merit List) गुणवत्तेनुसार प्रवेशास पात्र राहतील.

२१.३ गुणवत्तायादीनुसार प्रवेश प्रक्रिया राबविल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित जागा रिक्त राहिल्यास त्यावर विशेष मागास वर्ग (SBC) उमेदवार जास्तीतजास्त २ टक्के इतक्या जागांवर गुणवत्तेनुसार प्रवेशास पात्र असतील.

२१.४ केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या तात्पुरत्या प्रवेश निश्चितीनंतर संबंधित महाविद्यालय प्रमाणपत्राची छाननी करेल. या छाननीमध्ये गुणांत/जातीच्या संदर्भात/पात्रतेच्या संदर्भात त्रुटी आढळल्यास व तपासणीअंती सिद्ध झाल्यास तात्पुरता प्रवेश महाविद्यालयामार्फत लेखी कारण देऊन रद्द केला जाईल. त्यामुळे केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतून देण्यात आलेला तात्पुरता प्रवेश अंतिम मानण्यात येऊ नये.

२१.५ मागासवर्गीय प्रवर्गातील काही जागा रिक्त राहिल्यास त्या खालील गटातील अंतर्गत बदलाने भरल्या जातील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गट १ | i) | अनुसूचित जाती व नवबौद्ध (SC) | ii) | अनुसूचित जमाती (ST) |
| गट २ | i) | विमुक्त जाती (VJ) (अ) | ii) | भटक्या जमाती (NT1) (ब) |
| गट ३ | i) | अ) भटक्या जमाती (NT2) (क)<br>ब) इतर मागासवर्गीय जाती (OBC) | ii) | भटक्या जमाती (NT3) (ड) |

२१.६ २१.५ प्रमाणे बदल करूनही मागासवर्गीय संवर्गाच्या जागा रिक्त राहिल्यास त्या सर्व मागासवर्गीय उमेदवारांमधून एकत्रित गुणवत्तेनुसार भरल्या जातील.

२१.७ अ) यानंतरही जागा रिक्त राहिल्यास त्या खुल्या संवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरल्या जातील.

ब) २ टक्क्यांमधून जागा रिक्त राहिल्यास त्यांचा समावेश २८ टक्क्यांमध्ये संवर्गनिहाय/विषयनिहाय करून भरण्यात येतील. तसेच २८ टक्क्यांच्या पुरेशा जागा उपलब्ध न झाल्यास त्या संवर्गनिहाय व विषयनिहाय ७० टक्क्यांमधून भरण्यात येतील.

२१.८ विषयांच्या विहित जागा रिक्त राहिल्यास पुढीलप्रमाणे बदल करून प्रवेश देण्याचे अधिकार प्रवेश समितीला असतील :

I) एखाद्या संवर्गाच्या एखाद्या विषयात राखीव महिला कोट्यात त्या संवर्गाच्या पुरेशा महिला उमेदवार उपलब्ध नसतील तर त्या रिक्त जागा त्याच संवर्गातील त्याच विषयाच्या जनरल मेरीटमधून भरण्यात येतील.

II) भाषा विषयांतर्गत बदल.

III) कृषी / वैद्यकीय व विज्ञान विषयांतर्गत बदल.

IV) संगणक/माहिती तंत्रज्ञान/अभियांत्रिकी व गणित विषयांतर्गत बदल.

V) विज्ञान/गणित विषयांतर्गत बदल.

VI) या बदलानंतरही भाषा, विज्ञान, गणित, वाणिज्य यांच्या जागा रिक्त राहिल्या तर त्या इतिहास, भूगोल, सामाजिक शास्त्र विषयाच्या विहित टक्केवारीनुसार विभागून देण्यात येतील.

VII) इतिहास व भूगोल विषयांतर्गत बदल यात जागा शिल्लक राहिल्या तर सामाजिक शास्त्र अध्यापन पद्धतीस देण्यात येतील.

VIII) या सर्व बदलानंतरही जागा रिक्त राहिल्यास सर्व विषयांच्या एकत्रित गुणवत्ता यादीतून प्रवेश दिला जाईल.

IX) यानंतरही जागा रिक्त राहिल्यास माध्यम बदलून (उमेदवाराने दिलेल्या पात्र माध्यमानुसार) प्रवेश दिला जाईल.

## २२ प्रवेशित उमेदवारांच्या महाविद्यालय अदलाबदलीबाबत :

२२.१ प्रवेशित उमेदवारांची कोणत्याही परिस्थितीत परस्पर अदलाबदल (Mutual Transfer) केली जाणार नाही. तथापि, अपवादात्मक परिस्थितीत मा. संचालक (उच्च शिक्षण) यांच्या मान्यतेने महाविद्यालय सुरू होण्यापूर्वी **प्रथम वर्षी** १५ दिवसांच्या आत व जर महाविद्यालय सुरू झाल्यानंतर प्रवेश मिळाला असल्यास ८ दिवसांच्या आत अशी अदलाबदल करता येईल. यासाठी संबंधित उमेदवारांनी खालील पद्धती अवलंबवावी :

२२.२ शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेचा पुणे येथे देय असणारा रु. १०००/- चा धनाकर्ष (Demand Draft) काढावा.

२२.३ शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे येथील बी.एड. कक्षात विहित नमुन्यात विहित वेळेत धनाकर्षासह प्रत्यक्ष अर्ज सादर करावा.

२२.४ बदली उमेदवाराचा शोध स्वत: बदली आवश्यक असलेल्या उमेदवाराने घ्यावा. ही बदली मागणाऱ्या उमेदवाराची जबाबदारी आहे.

२२.५ अदलाबदली करणारे दोन्ही उमेदवार एकाच संवर्ग / अध्यापन पद्धती / माध्यम / कोट्यातील असावेत.

२२.६ संबंधित दोन्ही महाविद्यालयांच्या प्राचार्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

२२.७ अदलाबदल ही विशेष तरतूद आहे, तो हक्क नाही याची नोंद संबंधित उमेदवारांनी घ्यावी.

## २३ तात्पुरत्या प्रवेशाची अंतिम प्रवेश निश्चिती :

२३.१ उमेदवाराने भरलेल्या अर्जाची केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समितीद्वारा छाननी/तपासणी केली जात नाही. त्यामुळे केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारा देण्यात आलेले तात्पुरते प्रवेशपत्र अंतिम प्रवेशपत्र म्हणून ग्राह्य धरले जाणार नाही. केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारा देण्यात आलेल्या तात्पुरत्या प्रवेशपत्राच्या आधारे संबंधित महाविद्यालयाने उमेदवारांच्या बी.एड. प्रवेशासाठी आवश्यक प्रमाणपत्रांची व गुणवत्तेची छाननी करून पात्र असल्यास निर्धारित शुल्क विहित वेळेत भरल्यानंतर प्रवेश अंतिम केला जाईल. केंद्रीय बी.एड. प्रवेश नियमावली व संबंधित विद्यापीठाचे बी.एड. अभ्यासक्रमासंबंधीचे पात्रतेचे निकष यांच्या आधारे उमेदवाराचा प्रवेश अंतिम करण्याची जबाबदारी संबंधित अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.

२३.२ उमेदवाराने खालीलपैकी कोणतीही माहिती चुकीची भरल्याचे महाविद्यालयाच्या निदर्शनास आल्यास प्रवेश नाकारण्यात येईल. अ) पदवी तीन वर्षांची, ब) किमान पात्रता गुण (टक्केवारी) पदवी किंवा पदव्युत्तर, क) किमान सी.ई.टी. गुण, ड) संवर्ग, इ) विषय/अध्यापन पद्धती, ई) माध्यम, फ) कोटा, ग) विद्यापीठनिहाय प्रवेश पात्रता.

२३.३ खालील प्रमाणपत्रे सादर न केल्यासही प्रवेश नाकारण्यात येईल :

अ) सी.ई.टी. गुणपत्रिका,

ब) अध्यक्ष, केंद्रीय प्रवेश समिती यांच्या सहीचे तात्पुरते प्रवेशपत्र,

क) गुणवत्तेसाठी ग्राह्य धरलेल्या गुणांसाठीचे आवश्यक मूळ गुणपत्रके व प्रमाणपत्रे,

ड) संवर्गाच्या लाभासाठी शासनाच्या निर्णयानुसार आवश्यक सर्व प्रमाणपत्रे,

इ) अपंग, आजी-माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, परित्यक्ता, घटस्फोटीत महिला, विधवा व संबंधित सवलती असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र,

ई) इंग्रजी माध्यमाच्या प्रवेशासाठी इंग्रजी भाषा ज्ञान चाचणी गुणपत्रिका.

वरील बाबींपैकी काही उणिवा/त्रुटी/चुकीची माहिती किंवा प्रमाणपत्रांची कमतरता यामुळे महाविद्यालयात प्रवेश नाकारला जाईल व याबाबतची सर्वस्वी उमेदवाराची जबाबदारी राहील.

## २४ शुल्क परतावा :

२४.१ अ) प्रथम वर्षी प्रवेश अंतिम झाल्यानंतर व प्रत्यक्ष विद्यापीठाच्या वेळापत्रकानुसार अभ्यासक्रम सुरू होण्यापूर्वीच्या कालावधीमध्ये उमेदवाराने कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केल्यास महाविद्यालयास शुल्कामधून फक्त रु. १०००/- कपात करता येईल.

आ) अभ्यासक्रम सुरू झाल्यानंतर प्रवेशित विद्यार्थ्याने ८ दिवसांच्या आत स्वत: प्रवेश रद्द केल्यास १० टक्के कपात करता येईल.

इ) ९ ते १५ दिवसांच्या आत प्रवेश रद्द केल्यास २० टक्के कपात करता येईल.

ई) १६ ते ४५ दिवसांत रद्द केल्यास ५० टक्के शिक्षण शुल्क कपात करता येईल.

उ) ४५ दिवसानंतर प्रवेश रद्द केल्यास कोणतेही शुल्क परत दिले जाणार नाही.

२४.२ विद्यापीठ पात्रतेमुळे किंवा प्रवेश पात्रतेमुळे समितीद्वारा प्रवेश रद्द झाल्यास उमेदवारास संपूर्ण शुल्क परत करणे महाविद्यालयावर बंधनकारक राहील.

२४.३ प्रवेशित विद्यार्थी विद्यापीठाच्या वेळापत्रकानुसार महाविद्यालय सुरू झाल्यापासून सतत आठ दिवस काहीही न कळवता गैरहजर राहिल्यास त्याचा प्रवेश आपोआप रद्द होईल व कोणत्याही सबबीवर शिक्षण शुल्क परत केले जाणार नाही. उमेदवाराचा अंतिम प्रवेश होऊन उमेदवार महाविद्यालयात उपस्थित झाल्यानंतर गैरहजर असल्यास महाविद्यालयाने विद्यापीठ नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

२४.४ **मूळ कागदपत्रे महाविद्यालयाकडे ठेवण्याबाबत :**

कोणत्याही उमेदवाराचे मूळ कागदपत्र अंतिम प्रवेशाच्या तपासणीनंतर महाविद्यालयाला स्वत:कडे जमा करून ठेवता येणार नाहीत; तथापि, विद्यापीठ पात्रतेसाठी / केंद्रीय प्रवेश प्रक्रियेकडे तपासण्याच्यावेळी / प्रवेश नियंत्रण समितीच्या तपासण्याच्यावेळी मूळ प्रमाणपत्रे उमेदवारास महाविद्यालयामार्फत सादर करावी लागतील.

## २५ कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक :

२५.१ अ) **प्रवेश पद्धती :**

महाराष्ट्र शासनाच्या सन २०१५-१६ च्या सी.ई.टी. परीक्षेचा निकाल लागल्यावर कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातर्फे महाराष्ट्रातील सर्व प्रमुख वर्तमानपत्रात प्रवेशासाठी जाहिरात दिली जाईल. ही जाहिरात www.sanskrituni.net या विश्वविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल. त्या जाहिरातीत विश्वविद्यालयाशी संलग्नित प्रवेश योग्य महाविद्यालयांची नावे अर्जदाराने पसंतीक्रम दर्शविण्यासाठी नमूद केली जातील. राज्याच्या माध्यमिक बोर्डाची १०व्या वर्गाची परीक्षा संस्कृत विषय घेऊन उत्तीर्ण असलेल्या किंवा याहून वरच्या वर्गाची /स्तराची परीक्षा संस्कृत विषय घेऊन उत्तीर्ण असलेल्या आणि सी.ई.टी. उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी विश्वविद्यालयाने दिलेल्या नमुन्यात अर्ज करावा. अर्जाचा नमुना विश्वविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल. त्यानंतर विश्वविद्यालयाने जाहिरात दिलेल्या प्रवेश वेळापत्रकानुसार प्रवेश केले जातील. ही संपूर्ण प्रवेश प्रक्रिया प्रत्येक टप्प्यानुसार संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

ब) बी.एड. चे सर्व प्रवेश विश्वविद्यालयाच्या केंद्रीय प्रवेश समितीद्वारे केले जातील.

२५.२ **कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या बी.एड. प्रवेशाची अर्हता :**

ज्याने महाराष्ट्र शासनाची बी.एड. प्रवेशासाठी असलेली सी.ई.टी. परीक्षा सत्र २०१५-१६ च्या बी.एड. प्रवेशासाठी उत्तीर्ण केली असेल व कोणत्याही विद्याशाखेचा पदवीधर, ज्याने राज्याच्या माध्यमिक बोर्डाची १० व्या वर्गाची परीक्षा संस्कृत विषय घेऊन उत्तीर्ण केली आहे किंवा याहून वरच्या वर्गाची/स्तराची परीक्षा संस्कृत विषय घेऊन उत्तीर्ण केली आहे असा अर्हताधारक अर्जदार पात्र राहील.

२५.३ **कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयांतर्गत अध्यापक महाविद्यालये व उपलब्ध जागा :**

| क्र. | महाविद्यालयाचे नाव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १. | कालिदास विश्वविद्यालयाचे अध्यापक महाविद्यालय, कस्तुरबा भवन, बजाज नगर, नागपूर. | १०० |
| २. | कीर्तन केसरी भाऊसाहेब शेवाळकर शिक्षाशास्त्री महाविद्यालय, सी.एम. कढी शैक्षणिक परिसर, परतवाडा, जि. अमरावती. | १०० |
| ३. | श्रीमती शकुंतला नरगुंदकर महिला शिक्षणशास्त्री महाविद्यालय, देवनगर, खामला, नागपूर. | १०० |
| ४. | कृष्णाजी जोशी शिक्षाशास्त्री महाविद्यालय, तिरुपती तंत्रनिकेतन, केशवनगर, अकोला. | १०० |
| ५. | रामकृष्ण शिक्षाशास्त्री महाविद्यालय, उत्तम नगर, अमरावती. | १०० |
| ६. | स्वर्गीय रामरावजी दुधे अध्यापक महाविद्यालय, दारव्हा, जि. यवतमाळ. | १०० |

उपरोक्त बी. एड. महाविद्यालयातील एकूण ६०० जागा प्रवेश घेण्यासाठी उपलब्ध आहेत. येथे इतर बी.एड. अभ्यासक्रमामध्ये उपलब्ध १६ अध्यापन पद्धती निवडीसाठी उपलब्ध आहेत. विश्वविद्यालयाच्या परीक्षेसाठी मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत यांपैकी कोणतेही माध्यम घेता येते. कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे स्वतःची गुणवत्ता यादी आणि प्रवेश स्वतंत्रपणे केंद्रीभूत पद्धतीने विश्वविद्यालयाकडूनच केले जातील. या विश्वविद्यालयाने त्यांच्या नियमाप्रमाणे पात्रता पडताळून गुणवत्तेप्रमाणे प्रवेश द्यावयाचे आहेत. यामध्ये ९८ टक्के कोटा हा महाराष्ट्रासाठी व २ टक्के कोटा महाराष्ट्राबाहेरील उमेदवारांसाठी आहे. सदर प्रवेश कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय यांनी तयार केलेल्या निर्णयानुसार देण्यात येतील. रिक्त राहिलेल्या जागा उपलब्धतेनुसार महाराष्ट्रातील किंवा बाहेरील अर्जदारांमधून भरण्यात येतील.

## २६ एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ :

या विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ७० टक्के जागांसाठी एस.एन.डी.टी.ची अध्यापक महाविद्यालये ज्या विभागक्षेत्रात येतात त्या विभागक्षेत्रातील त्या महाविद्यालयातील प्रवेशासाठी एस.एन.डी.टी. विद्यापीठाच्या ज्या पात्र उमेदवारांनी त्या महाविद्यालयासाठी अर्ज केला आहे, त्यांना गुणवत्तेनुसार प्रथम प्रवेश दिला जाईल व उरलेल्या जागा त्या त्या विभागातील महिला उमेदवारांतून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

## २७ अपंगांचे शिक्षक म्हणून काम करण्यासाठी विशेष - बी. एड. अभ्यासक्रम (B.Ed. Special Education) :

विशेष शिक्षण म्हणजे कर्णबधिर, अंध, मतिमंद, अध्ययन अक्षमता असणारे, अस्थिव्यंग व मेंदूसंबंधित दुर्बलता असणाऱ्या विशेष शैक्षणिक गरजा असणाऱ्या विविध प्रकारच्या अपंग मुलांचे शिक्षण. हे शिक्षण अपंगांच्या विशेष शाळेत, सर्वसाधारण मुलांच्या शाळेत, समावेशित शिक्षणांतर्गत सर्व शाळांमध्ये प्रवेश दिलेल्या अपंगांना त्यांच्या गरजांनुसार दिले जाते.

नवीन विचारधारेनुसार आता या मुलांना अपंग असे संबोधले जात नाही. ह्या सर्व मुलांना आता **'विशेष गरजा असलेली मुले'** असे संबोधले जाते. या मुलांचे शिक्षण, विशेष शिक्षणासाठी प्रशिक्षित शिक्षकांशिवाय होऊ शकत नाही. हे विशेष शिक्षण प्रशिक्षण ज्या महाविद्यालयात दिले जाते, त्या महाविद्यालयांना **'विशेष शिक्षण अध्यापक महाविद्यालये'** असे म्हणतात. ही महाविद्यालये विविध प्रकारच्या विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी विशेष शिक्षक तयार करतात. या महाविद्यालयांत वेगवेळ्या प्रकारचे अपंगत्व असलेल्या मुलांना शिकविण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक तयार केले जातात. भारतीय पुनर्वास परिषद (RCI), नवी दिल्ली यांच्याद्वारे या प्रशिक्षणासाठी अभ्यासक्रम ठरविला जातो. या महाविद्यालयांची विद्यार्थी संख्या, प्रवेशाचे निकष यांना भारतीय पुनर्वास परिषदेची मान्यता असते. भारतीय पुनर्वास परिषदेच्या केंद्रीय नोंदणी रजिस्टर (CRR) मध्ये नाव नोंदविल्याशिवाय कोणतीही व्यक्ती व मान्यतेशिवाय कोणतीही संस्था या क्षेत्रात काम करू शकत नाही. या क्षेत्रात बी.एड. केल्याने आता अनेक ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत.

१. हे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर शिक्षक समावेशित शिक्षणातील युनिटमध्ये काम करू शकतात. ५ अपंग मुलांमागे एका शिक्षकाची नियुक्ती शाळेतील युनिटमध्ये केली जाते.

   १.१ युडीआयएसई अहवाल महाराष्ट्र शासन २०१२-१३नुसार इयत्ता ९वी ते १२वी वर्गामध्ये ३४,४३५ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. महाराष्ट्रात त्यासाठी केवळ ३०० शिक्षक विशेष शिक्षण पदवीधारक नियुक्त केले आहेत. वरील आकडेवारीनुसार माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावर विविध प्रकारच्या अपंगांना शिकविण्यासाठी ६,५०० प्रशिक्षित शिक्षकांची आवश्यकता आहे.

२. हे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर सर्व शिक्षा अभियानांतर्गत समावेशित शिक्षणात विशेष शिक्षक/फिरते शिक्षक म्हणून काम करता येते. महाराष्ट्रातील शासकीय व अशासकीय संस्थांमध्ये ७०,७७६ (युडीआयएसई अहवाल - महाराष्ट्र शासन २०१२-१३) विशेष गरजा असलेल्या मुलांनी ६वी ते ८वी या वर्गांमध्ये प्रवेश घेतला असून सर्व शिक्षा अभियानांतर्गत या मुलांना शिकविण्यासाठी ७,७०० शिक्षकांची आवश्यकता आहे. महाराष्ट्र शासनाने यापैकी केवळ १००० बी.एड. विशेष शिक्षण पदवीधारक शिक्षकांची नियुक्ती केली असून विद्यार्थी संख्येनुसार ६,७०० जागा भराव्या लागणार आहेत.

३. राष्ट्रीय शिक्षण मोहिमेअंतर्गत लवकरच विषयतज्ज्ञ, विशेष शिक्षक, रिसोर्स टिचर म्हणून या विशेष शिक्षकांची नियुक्ती केली जाणार आहे. त्यामुळे या शिक्षकांची अधिक गरज आहे.

४. हे प्रशिक्षण घेऊन विशेष शाळेत विशेष शिक्षक म्हणूनही काम करता येते. महाराष्ट्रात ६२ अंधांच्या, ३८३ कर्णबधिरांच्या, ६६२ मतिमंदांच्या, ३१९ अस्थिव्यंग मुलांच्या, २० शासकीय संमिश्र केंद्रे अशा एकूण १४४६ विशेष शाळांमध्ये विशेष शिक्षक म्हणून रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

५. याशिवाय बी.एड. नंतर विशेष शिक्षण पदविका स्तरावर अधिव्याख्याता म्हणून काम करता येते.

६. अपंगांचे विशेष ट्युशन क्लासेस घेता येतात.

७. महाराष्ट्रात बी.एड. विशेष शिक्षण पदवी देणारी ३१ महाविद्यालये असून प्रत्येकी फक्त २५ प्रवेशक्षमता असून, प्रतिवर्षी फक्त ७७५ विशेष शिक्षक प्रशिक्षित होऊ शकतात.

याशिवाय सरकारच्या (CBR) समुदायाधारित पुनर्वसन कार्यक्रमात अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

**(सूचना :** ***क्र. २५, २६, २७ अभ्यासक्रमासाठी इच्छुक उमेदवारांनी अर्जात स्वतंत्र नोंद करावी.*** )

**डॉ. धनराज माने**
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे
अध्यक्ष व सक्षम अधिकारी,
बी.एड. प्रवेश समिती

# सामाईक प्रवेश परीक्षा : नमुना प्रश्नपत्रिका - उत्तरासहित

## बी. एड्. प्रवेश

१ **स्वरूप :**

बी. एड्. प्रवेशासाठी घेण्यात येणारी सामाईक परीक्षा तीन घटकांवर आधारलेली असेल. हे तीन घटक म्हणजे मानसिक क्षमता, शिक्षक अभिक्षमता व सामान्यज्ञान होय. या तीन घटकांचा अधिभार अनुक्रमे ३०% ४०% ३०% व ३०% असा असेल. प्रत्येक विभागात वस्तुनिष्ठ प्रकाराचे बहुपर्यायी प्रश्न असतील. एक तासाच्या (६० मिनिटांच्या) कालावधीत तुम्हाला एकूण ५० प्रश्न सोडवायचे आहेत.

१.१ **मानसिक क्षमता : (अधिभार ३०%)**

तुमच्या कारणमीमांसा क्षमतेचा अंदाज घेणे हा या चाचणीचा मुख्य हेतू आहे. तुम्ही किती जलद आणि अचूक विचार करू शकता हे समजण्यासाठी या चाचणीचा उपयोग होतो. या चाचणीतील प्रश्न शृंखला / श्रेणी, तर्काधिष्ठता, सांकेतिकरण - निःसांकेतिकरण, परस्परसंबंध / नातेसंबंध, साधर्म्य, वर्गीकरण, सोंगटी-कूट प्रश्न इ. भाषिक तसेच अभाषिक स्वरूपाचे असू शकतील.

१.२ **शिक्षक अभिक्षमता : (अधिभार ४०%)**

शिक्षक बनण्यासाठी तुमच्यामध्ये असलेले सामर्थ्य जाणून घेणे हा या चाचणीचा प्रधान उद्देश आहे. ज्ञान अद्ययावत ठेवण्याची लालसा, नेतृत्व गुण, शिक्षणक्षेत्रातील व समाजातील बदलांसंदर्भातील जाणीव जागरुकता, संप्रेषण, व्यावसायिक निष्ठा इ. बाबींवर आधारित प्रश्न या चाचणीत समाविष्ट असतील.

१.३ **सामान्य ज्ञान : (अधिभार ३०%)**

परिसरात, स्थानिक / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय पातळीवर घडणाऱ्या घटना तसेच भूतकाळातील प्रसंग, चालू घडामोडी, विज्ञान, तंत्रज्ञान, इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, राज्यशास्त्र, साहित्य व शिक्षण या क्षेत्रातील सर्वसामान्य घटना / प्रसंग यांच्याशी तुम्ही किती प्रमाणात परिचित आहात हे या चाचणीद्वारे पाहिले जाईल.

२ **महत्त्वाच्या सूचना :**

२.१ सर्व प्रश्न सक्तीचे आहेत, तेव्हा आधी सर्व प्रश्न वाचून त्यातले काही सोडवण्यासाठी निवडायचे असे करण्यात वेळ दवडू नका. कोणत्याही प्रश्नाला विकल्प नसेल आणि सर्व प्रश्नांना सारखेच गुण असतील.

२.२ एकेक प्रश्न वाचा व त्याचे उत्तर तुम्हाला दिलेल्या स्वतंत्र उत्तरपत्रिकेवर नोंदवा.

२.३ दिलेल्या पर्यायांमधून सर्वाधिक योग्य पर्यायाची उत्तर म्हणून निवड करा. त्यानंतर उत्तरपत्रिकेतील ज्या चौकटीत बरोबर उत्तराचा क्रमांक लिहिलेला असेल ती **चौकट काळ्या शाईचे पेन वापरून पूर्णपणे रंगवा.**

उदाहरणार्थ, पाहा पुढे चार पर्याय चौकटी दिल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

समजा, बरोबर उत्तराच्या पर्यायाचा क्रमांक ३ आहे तर ३ लिहिलेली **चौकट काळ्या शाईच्या पेनाने पूर्णपणे रंगवावी लागेल.** कशी ती पाहा -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | २ | ■ | ४ |

दुसऱ्या कोणत्याही प्रकारे तुमचे उत्तर नोंदवू नका.

२.४ जर का तुम्हाला तुमचे उत्तर बदलण्याची गरज पडलीच तर आधी रंगवलेली चौकट फुली मारून रद्द करा. नंतर तुमचे उत्तर वर २.३ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे परत नोंदवा.

२.५ ज्या क्रमांकाचा प्रश्न तुम्ही सोडवत आहात त्याच क्रमांकाच्या समोर उत्तरपत्रिकेत तुम्ही तुमचे उत्तर नोंदवत आहात याची खात्री करा.

२.६ जर एखाद्या प्रश्नाचे उत्तर सुचत नसेल तर तो प्रश्न सोडून द्या आणि पुढे जा. त्यावर वेळ खर्च करू नका, त्या प्रश्नाचा नंतर विचार करा.

२.७ केवळ यादृच्छिकरीत्या किंवा अंदाजापोटी उत्तरे देण्याचे निक्षून टाळा.

३ **नमुना प्रश्न :**

यापूर्वी वर्णन केलेल्या चारही घटकांशी संबंधित काही नमुना प्रश्न पुढे सादर केले आहेत. येथे समाविष्ट केलेले प्रश्नप्रकार हे केवळ उदाहरणादाखल आहेत. ते सर्वसमावेशक नाहीत. प्रत्यक्ष चाचणीत येथे दर्शविलेल्या नमुन्याचे प्रश्न असतील किंवा यापेक्षा वेगळ्या प्रकारचेही प्रश्न असू शकतील.

३.१ **मानसिक क्षमता :**

शृंखला / श्रेणी : या प्रकारात एक प्रश्न तीन आकृत्यांच्या रूपात डावीकडे दिला आहे. या तीन प्रश्न आकृत्यांची एक शृंखला आहे. चौथ्या चौकटीत प्रश्नचिन्ह आहे.

प्रश्न आकृत्या




उत्तर आकृत्या



१ २ ३ ४

तुमच्या लक्षात आलेच असेल की प्रश्न आकृत्यांमधील चित्र घटिवत (घड्याळ्याच्या दिशेने) पुढे जात आहे. याच पद्धतीने हे चित्र आणखी पुढे सरकले तर प्रश्नचिन्हाच्या चौकटीतील चित्र कसे असेल हे तुम्हाला ठरवायचे आहे. उजव्या बाजूला चार चौकटी चित्रांसह दिल्या आहेत पाहा. त्यांना क्रमांक दिले आहेत. या चार पर्यायी उत्तरांमधून तुम्हाला सर्वाधिक योग्य उत्तर निवडायचे आहे.

चारही पर्यायी उत्तरांचे नीट निरीक्षण करा. तुमच्या लक्षात आलेच असेल की योग्य पर्याय - उत्तर ३ आहे.

| १ | | २ | | ■ | | ४ |

**तर्काधिष्ठता :**

यामध्ये दोन स्वतंत्र विधाने दिलेली असतात. या दोन विधानांवरून तुम्हाला एक निष्कर्ष काढायचा असतो.

प्र.१ (अ)काही महिला शिक्षक आहेत

(ब) एकही शिक्षक पदवीधर नाही

(१) कोणीही महिला पदवीधर नाहीत
(२) एकही पदवीधर महिला नाही.
(३) काही महिला पदवीधर नाहीत
(४) कोणीही शिक्षक महिला नाहीत
उ. वरील चार पर्यायापैंकी क्र.३ हे उत्तर बरोबर आहे.

| १ | | २ | | ■ | | ४ |

प्र.२ (अ)सर्व पुस्तके ही पेट्या आहेत

(ब) काही पेट्या म्हणजे टेबले आहेत

(१) सर्व पुस्तके म्हणजे टेबले आहेत (२) सर्व टेबले म्हणजे पुस्तके आहेत
(३) काही पुस्तके ही पेट्या नाहीत (४) काही पुस्तके म्हणजे टेबले आहेत
उ. येथे बरोबर उत्तरांचा ४ क्रमांक आहे

| १ | | २ | | ३ | | ■ |

**सांकेतिकरण - निःसांकेतिकरण :**

चिन्हे आणि प्रतिके यांचा विशिष्ट प्रकारे उपयोग करून संकेत तयार होतात. विविध अंक, आकृत्या, अक्षरे यांचाही उपयोग यात केला जातो. कधीकधी केवळ अक्षरे वगैरेचा क्रम बदलूनही सांकेतिकरण केले जाते. सांकेतिकरणाचा नियम सापडला की अर्थातच निःसांकेतिकरण सहज करता येते.

प्र.१ एका विशिष्ट संकेतानुसार MOTHER हे 162534 असे आणि FAME हे 9813 असे लिहिले आहे तर त्याच संकेतानुसार FARMER कसे लिहिले जाईल?

(१) 984134 (२) 984314 (३) 894134 (४) 984143

उ. येथे उत्तर १ आहे.

■ २ ३ ४

**परस्परसंबंध / नातेसंबंध :**

प्रश्नात पुरवलेल्या माहितीवरून तुम्हाला दोन व्यक्तिमधील नातेसंबंध शोधायचा आहे.

प्र.१ अ हा ब चा भाऊ आहे. ब हा क चा भाऊ आहे. ड चा पती क आहे. अ चे वडील ई आहेत. तर ड चे ई शी नाते काय आहे?

(१) पत्नी (२) मुलगी (३) सून (४) बहीण

उ. येथे या प्रश्नाचे उत्तर ३ आहे.

१ २ ■ ४

**साधर्म्य :**

दिलेल्या पहिल्या जोडीतील दोन शब्दांमधील संबंध प्रस्थापित करा. नंतर तोच संबंध दर्शविणारी शब्दाची जोडी तुम्हाला दिलेल्या पर्यायांमधून शोधायची आहे.

प्र.१ वैमानिक : विमान

(१) वकील : कोर्ट (२) कॅप्टन : जहाज (३) ट्रॅक्टर : शेतकरी (४) अभिनेता : रंगमंच

उ. येथे उत्तर २ आहे

१ ■ ३ ४

कारण ज्याप्रमाणे वैमानिक विमानावर नियंत्रण ठेवतो त्याचप्रमाणे कॅप्टन देखील जहाजाचे नियंत्रण करतो.

**सोंगटीवरील कूटप्रश्न :**

प्रत्येक सोंगटीला सहा पृष्ठे असतात प्रत्येक पृष्ठावर एक अंक लिहिलेला असतो. एकच सोंगटी तुम्हाला वेगवेगळ्या स्थितीत दाखवली जाते. त्याचे निरीक्षण करून सोंगटीवरील एखाद्या अंकांच्या विरुद्ध पृष्ठावरचा अंक कोणता हे तुम्हाला शोधायचे आहे.

प्र. १ अ ब




(अ) आणि (ब) या एकाच सोंगटीच्या दोन स्थिती आहेत. आणखी एखाद्या स्थितीत जर (१) हा अंक तळाच्या पृष्ठावर असेल तर वरच्या पृष्ठांवर कोणता अंक असेल?

(१) २ (२) ४ (३) ५ (४) ३

उ. येथे उत्तर ४ आहे

[१] [२] [३] ■

कारण (१) हे (३) च्या विरुद्ध पृष्ठावर आहे.

### ३.२ शिक्षक अभिक्षमता :

पुढील प्रश्न वाचा व दिलेल्या पर्यायांमधून योग्य उत्तर निवडा

**विषयज्ञान अद्ययावत ठेवणे :**

प्र.१ फुरसदीचा वेळ तुम्ही कसा व्यतीत करता?

(१) बहुतांश वेळ टी.व्ही.वरील सिनेमा पाहणे (२) पत्ते खेळणे

(३) पुस्तक वाचणे (४) विशेष असे काही न करणे

उ. येथे अपेक्षित उत्तर आहे ३.

[१] [२] ■ [४]

**नेतृत्वगुण :**

प्र.१ समजा तुम्ही शिक्षक आहात पुढील पैकी कोणती कृती तुम्ही प्राधान्याने कराल?

(१) पर्यावरण मंडळाचे सदस्य होणे

(२) शाळेतील अधिकाऱ्यांनी ठरवलेले कार्यक्रम पार पाडणे

(३) सर्वक्षण अभ्यासाचे आयोजन करणे

(४) विद्यार्थी कल्याण निधी कार्यरत होण्यासाठी त्याचे नियम करायला मुख्याध्यापकांना मदत करणे.

उ. येथे अपेक्षित उत्तर आहे ३

[१] [२] ■ [४]

**शिक्षणक्षेत्र व समाज यांच्यातील बदलांची जाणीव जागृती :**

प्र. १ तुमच्या बाबतीत पुढीलपैकी कोणती बाब सत्य नाही?

(१) मी जवळजवळ दररोज वर्तमानपत्र वाचतो / ते

(२) मी जवळजवळ रोजच रेडिओवरील बातम्या ऐकतो / ते

(३) मी बहुतांश रोज टी. व्ही. वरील बातम्या पाहतो / ते

(४) धकाधकीच्या दिनचर्येमुळे मला वरीलपैकी (१ ते ३) काहीच करणे जमत नाही

उ. येथे अपेक्षित उत्तर आहे ४

[१] [२] [३] ■

**संप्रेषण :**

प्र. १ पुढीलपैकी कोणत्या गोष्टीत तुम्ही कधी सहभागी झाला होता?

(१) क्रीडा स्पर्धांचे आयोजन

(२) शाळा/कॉलेजच्या नियत कालिकात किंवा वर्तमानपत्रात लेखन

(३) वक्तृत्व स्पर्धांना उपस्थिती

(४) क्षेत्र सहलींमध्ये सहभाग

उ. संप्रेषणाशी संबंधित लेखन असल्याने उत्तर आहे.

■ २ ३ ४

**व्यावसायिक निष्ठा :**

प्र. १ समजा तुम्ही शिक्षक आहात आणि तुमच्या असे लक्षात येते की तुमचे एक सहकारी शिक्षक हे व्यावसायिक नैतिकतेचे उल्लंघन करत आहेत, तर तुम्ही -

(१) सहकारी शिक्षकांचे मन वळवून त्यांनी व्यावसायिक नैतिकता पाळावी यांचा पाठपुरावा कराल

(२) मुख्याध्यापकांच्या कानावर घालाल.

(३) इतर शिक्षकांच्या देखत त्या शिक्षकांवर टीका कराल

(४) त्याकडे दुर्लक्ष कराल

उ. या प्रश्नाचे अपेक्षित उत्तर आहे

■ २ ३ ४

**३.३ सामान्य ज्ञान :**

पुढील प्रश्न काळजीपूर्वक वाचा आणि दिलेल्या पर्यायांमधून सर्वाधिक योग्य पर्याय निवडा :

प्र.१ गुरुत्वाकर्षणाच्या नियमाचा शोध कोणी लावला?

(१) अल्बर्ट आइनस्टीन (२) आयझॅक न्यूटन

(३) चार्ल्स डार्विन (४) गॅलिलीओ

उ. अर्थातच 'आयझॅक न्यूटन' म्हणून पर्याय हे उत्तर

१ ■ ३ ४

प्र. २ 'ताडोबा' हे प्रसिद्ध राष्ट्रीय उद्यान ... येथे आहे.

(१) नागपूर (२) बोरीवली

(३) कोल्हापूर (४) चंद्रपूर

उ. याचे उत्तर आहे

१ २ ३ ■

प्र. ३ 'मूलोद्योगी शिक्षण पद्धती' चे जनक .... होते.

(१) डॉ. राधाकृष्णन (२) रविंद्रनाथ टागोर

(३) महात्मा गांधी (४) राजेंद्र प्रसाद

उ. यांचे उत्तर आहे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | २ | [redacted] | ४ |

प्र. ४ एमबीए (आयआयएम, अहमदाबाद) अभ्यासक्रमासाठी केंद्र शासनाने ........ रुपये फी प्रस्तावित केली.

(१) ३२,०००/- (२) ३०.०००/-

(३) १,३०,०००/- (४) ३५,०००/-

उ. याचे उत्तर आहे

| | | | |
|---|---|---|---|
| १ | [redacted] | ३ | ४ |

❑❑

# English Language Content Test (ELCT)

## Syllabus for ELCT

**1.1 Eligibility and Criteria :**

All eligible Candidates applying for Regular B.Ed. First Year Course for the Academic Year 2015-2016 and who wish to seek admission in English Medium Colleges of Education will have to appear for ELCT along with CET.

**1.2** The course content and, nature of the question paper, maximum marks and minimum passing marks will be as follows :

**1.2.1 Topic 1 : Comprehension** (Weightage 40%)

**Content :** I) Picture ii) Prose iii) Poetry iv) Dialogue.

**Purpose:** The questions on comprehension passage/s are meant for evaluating the ability to comprehend the given material either in the form of a picture, prose, poetry or dialogue.

These questions judge the ability to comprehend the meaning of the given material

**1.2.2 Topic-2 : Vocabulary Focus** (Weightage 10%)

**Content:** I) Spellings ii) Antonyms iii) Synonyms iv) Homonyms

**Purpose:** This set of questions aim to test the general mastery over vocabulary. The questions will test the ability to use the vocabulary meaningfully in variety of forms like words with similar meanings, opposite words, words having similar pronunciation but different meanings, comparison of the shades of the meanings.

**1.2.3 Topic-3: Grammar Focus:** (Weightage 16%)

**Content:** I) Punctuation ii) Articles iii) Prepositions
iv) Conjunctions v) Degrees of Adjectives

**Purpose:** The questions in this section aim at testing the application of the understanding of the English Grammar rules in the given context in above five areas.

**1.2.4 Topic-4: Sentence Formation** (Weightage14%)

**Content:** I) Affirmative-Negative-Interrogative-Assertive-Exclamatory, ii) Jumbled Sentences iii) Identifying errors in sentences.

**Purpose:** The questions in this section will test the ability of the candidate to move from one type of sentence to other, ability to rearrange the sentence/s according to the context, identify the problem spot in the sentence.

**1.2.5 Topic-5: Phonetics:** (Weightage 6%)

**Content:** I) Phonetic Transcription ii) Accent iii) Intonation Pattern

**Purpose:** The questions on the three broad areas are designed to test the candidate's awareness about the spoken aspect of the language.

**1.2.6 Topic-6: Verbal Idioms and Proverbs** (Weightage10%)

**Content:** I) Verbal Idioms ii) Proverbs

**Purpose:** The objective of these questions is to judge the ability of the candidate to understand and differentiate between the superficial and in-depth meaning of the idioms and proverbs of English.

**1.2.7 Topic-7: Figure of Speech** (Weightage 4%)

**Contnet:** I) Simile ii) Metaphor iii) Climax iv) Hyperbole v) Alliteration vi) Repetition vii) Anti-Climax etc.

**Purpose:** The questions in these section aim at judging the ability to identify the figure of speech and name it from the context in the given prose/poetry line/passage.

**1.3 Note:**

**1.3.1** The Duration of the Paper will of One Hour.

**1.3.2** The Maximum Marks will be 50.

**1.3.3** The Minimum Passing marks will be 25 i.e. 50%

**1.3.4** The Number of questions will be 50.

**1.4 Important Instructions:**

**1.4.1** All questions are compulsory.

**1.4.2** The question has one and only one correct answer.

**1.4.3** All questions have equal marks.

**1.4.4** Read the questions one by one and start recording your answers on the separate answer-sheet provided.

**1.4.5** Select the most appropriate answer from the given alternatives.

**1.4.6** The candidates should use Black Ball Pen to fill in the box completely bearing the correct answer number in the answer sheet as shown below.

**1.4.7** Do not mark your answer in any other way.

**1.4.8** Since your answer-sheet is varified by the computer, avoid canceling the answer.

**1.4.9** Avoid marking answers randomly by using wild guess.

❑❑

# Sample Questions with Answers
# (ELCT)

**1)** **Comprehension of the Passage**

If you are sitting on a mountain top and before you is the vast horizon, you feel that the whole of nature is draggling your mind in a vast cradle. Rabindranath Tagore learnt from nature, he enjoyed the colour, the smell, the light and joy of nature. In one of his songs of the Gitanjali, one feels as if he is dancing with the words "Light! Light!" on his lips. As a child he experienced with his father, the limitless charming beauty of the Himalayas and their sublime and deep serenity. Later as an adult, he spent four months at a time in a boat, on the river Padma. He would spend his days in the delightful company of the wind, the waves, the birds, the sky, the sunrise and the glorious sunset. We notice in Tagore's poetry the tenderness and the fragrance of his days.

**1. 1** What does the poet imagine when he sits on a mountain top, looking at the horizon?

1) Nature is beautifully dressed.
2) Nature is our mother.
3) The beauty of nature is always changing.
4) The mind grows vast with the beauty of nature.

Ans.:2 [1] [■] [3] [4]

**1. 2** Which natural regions are mentioned in this passage?

1) mountains, sunrise
2) rivers, sunset
3) sunrise, sunset
4) mountains, rivers

Ans.:4 [1] [2] [3] [■]

1. 3 What did Rabindranath Tagore experience with his father in the Himalayas?

1) He experienced beauty.
2) He experienced the beauty and the deep serenity of the mountains.
3) He spent his days in the company of the rivers in the Himalayas.
4) He spent his time in the company of rivers and mountains.

Ans.:2 [1] [■] [3] [4]

1. 4 What effect did the company of the wind, the waves, the birds, the sky, the sunrise and the sunset have on the poetry of Rabinranath Tagore?

1) His poetry was filled with tenderness and fragrance.
2) His poetry became musical and beautiful.
3) His poetry gained greatness and depth.
4) His poetry became sublime and deeply serene.

Ans.:1 [■] [2] [3] [4]

### 1.6 Figure to Description



Picture No. 1

1) This Picture shows ................................................................
   1) Railway 2) Station 3) Platform 4) Waiting room

Ans.:3   1   2   ■   4

2) The train is ...............................
   1) Arriving 2) Departing 3) Stopping 4) Whistling

Ans. 2   1   ■   3   4

3) The Relatives are ................ their hands.
   1) Shaking 2) Showing 3) raising 4) waving

Ans.:4   1   2   3   ■

## 2) Vocabulary Focus

**2.1** Choose the correct **synonym** for the word 'industrious'

1) manufacturer   2) industrialist
3) hard-working   4) labourer

Ans. : 3   1   2   ■   4

**2.2** Choose the correct **antonym** for the word ‘innocent’

| | |
|---|---|
| 1) poor | 2) guilty |
| 3) harmful | 4) involved |

Ans.: 2 [1] ■ [3] [4]

**2.3** Choose the correct **homonym** for the word ‘a loud’

| | |
|---|---|
| 1) loudly | 2) slowly |
| 3) alive | 3) allowed |

Ans.:4 [1] [2] [3] ■

**3) Grammar Focus :**

**3.1** Fill in the blanks with the right preposition from those given below :

1) to
2) of
3) about
4) on

Ans.: 1 ■ [2] [3] [4]

**3.2** Choose the number of punctuation errors in the sentence.
‘Who broke this desk’ asked the teacher ‘not i’ said Pratap.

1) 6    2) 7    3) 8    4) 9

Ans. : 4 [1] [2] [3] ■

**3.3** Choose the correct spelling.

1) sincerly
2) sinserely
3) sincerely
4) sincerley

Ans.: 3 [1] [2] ■ [4]

**4) Sentence conversion - Affirmative to Negative.**

**4.1** We should tell the truth.
This statement can be converted into negative as —

1) No one should tell the truth.
2) We should not tell the truth only.
3) Everybody should not tell the truth.
4) We should never tell lies.

Ans.: 4 [1] [2] [3] ■

**4.2 Exclamatory to Assertive —**

Oh! What a fantastic show that was. This statement can be converted into assertive as —

1) Was it a fantastic show?
2) It was a very fantastic show.
3) A very fantastic show was done by them.
4) It was not at all a fantastic show.

Ans.:2 [1] ■ [3] [4]

**Sentence Conversion - Jumbled Sentences**

**4.3** Which of the following is grammatically correct sentence?

1) This is one of the excellent book I have read.
2) These are one of the excellent books I have read.
3) This is one of the excellent books that I have read.
4) These are many of the excellent book that I have read.

Ans.:3 [1] [2] ■ [4]

**5) Phonetics :**

**5.1** The Phonetic transcription of the word 'all' is —

1) /al / 2) /ɔ:l / 3) / AAL / 4) /əɑll /

Ans.:2 [1] ■ [3] [4]

**5.2** Choose the correct stress.

1) 'arrangement
2) arr'angement
3) arrange'ment
4) arangem'ent

Ans.:1 ■ [2] [3] [4]

**6) Verbal Idioms and Phrases**

**6. 1** Choose the correct meaning of the following phrase —

to lead a dog's life —

1) to lead a natural life
2) to lead a life of lordship
3) to lead a miserable life
4) to live a faithful life.

Ans.: 3 [1] [2] ■ [4]

**6. 2** Choose the correct meaning of the following phrase 'in tune with' —

1) together with
2) according to
3) related to
4) friendly with

Ans.: 4 [1] [2] [3] ■

**Proverbs**

**6. 3** Choose the correct meaning of the following proverbs —

1) All clouds are bright.
2) There is equality in nature.
3) Everything has something good and positive in it.
4) There is beauty in everything.

Ans. :3 | 1 | 2 | ■ | 4 |

**6. 4** Choose the correct meaning of the following proverb —

Actions speak louder than words.

1) Actions are more important and impressive than only talking.
2) One should speak loudly.
3) We should act as we speak.
4) We should act first and then speak.

Ans.:1 | ■ | 2 | 3 | 4 |

**7) Figures of speech**

**7.1** Recognize the figure of speech in the following statement

I smile, I laugh, I roar.

1) simile
2) repetition
3) Hyperbole
4) Climax

Ans.: 4 | 1 | 2 | 3 | ■ |

**7. 2** Which of the following statements shows simile?

1) The camel is the ship of the desert
2) He looks as cheerful as rose
3) Oh death! Where is thy sting?
4) United we stand, divided we fall.

Ans. : 4 | 1 | 2 | 3 | ■ |

❑❑

## B. Ed. CET EXAMINATION CENTRES - 2015-16

| Sr. No. | Code | Exam Center Name | Count |
|---|---|---|---|
| **MUMBAI** | | | |
| 1 | MUM001 | Kirti M. Doongursi College, V. S. Marg, Kashinath Guru Rd, Mumbai 400028 | 1000 |
| 2 | MUM002 | Elphinstone College, Kala Ghoda, Fort, Mumbai | 250 |
| 3 | MUM003 | Sydenham Commerce & Economic Mahavidalaya, B Road, Churchgate, Mumbai | 300 |
| 4 | MUM004 | Maharshi Dayanand College, Dr.S.S.Rao Road, Parel, Mumbai 400012 | 700 |
| 5 | MUM005 | K.P.B.Hinduja Commerce College, 315, New Charni Road, Mumbai 400004 | 350 |
| 6 | MUM006 | D.G.Ruparel Arts, Com. & Science College, Matunga, Mumbai 400019 | 400 |
| 7 | MUM007 | Bhavans College, Munshi Nagar, Andheri (w), Mumbai - 400 086, | 500 |
| 8 | MUM008 | S.S. & L. S. Patkar College, S.V.Road, Goregaon (W), Mumbai - 400 062, | 600 |
| 9 | MUM009 | V.G.Vaze College of Arts, Commerce & Sicence, Mithanagar Road, Mulund (E), Mumbai - 400 081 | 400 |
| **PANVEL** | | | |
| 1 | RAI001 | J.S.M.Arts, Science & Commerce College, Alibag, Raigad - 402201, | 500 |
| 2 | RAI002 | Changu Kaka Thakur Arts, Science & Commerce Mahavidylaya, Block No.1,Sector.11,Khanda Colony,New Panvel,Dist:-Raigad,PIN:-410206 | 300 |
| 3 | RAT003 | R.P.Gogate College, Post - Ratnagiri, Ratnagiri | 1000 |
| 4 | SIN001 | Sant Rawool Mahavidyalaya, Kudal, Sindhudurg - 416520, | 500 |
| 5 | THA001 | Dnyansadhana College, Near Mental Hospital Sevice Road, Parab wadi, Behind Telco, Thane | 500 |
| 6 | THA002 | Birla College, Kalyan, Dist.-Thane | 1000 |
| 7 | THA003 | B.N.N. Arts, Science & Commerce College, Bhiwandi, Dist.-Thane, | 700 |
| 8 | THA004 | Annasaheb Vartak Mahavidylaya, Near Vasai Road Railway Station, Vasai,Dist:-Thane | 300 |
| **PUNE** | | | |
| 1 | AHM001 | New Arts, Science & Commerce College, Lal Taki Road, Ahmednagar | 1500 |
| 2 | AHM002 | Padmashri Vikhe Patil Arts, Science & Commerce College, Pravaranagar, Dist.-Ahmednagar | 500 |
| 3 | AHM003 | S. S. G. M. College, Kopargaon, Dist.-Ahmednagar | 500 |
| 4 | AHM004 | Bhaushaheb Santji Thorat Arts, Commerce & Science Mahavidyalaya, Sangmner, Dist.-Ahmednagar | 500 |
| 5 | AHM005 | Babuji Awad Mahavidayalaya, Pathardi, Dist.-Ahmednagar | 500 |
| 6 | NAS003 | H.P.T. College, Prin.T.A.Kulkarni Vidya Nagar, Nashik | 1500 |
| 7 | NAS001 | K.T.H.M. College, Gangapur Road, Nashik | 1500 |
| 8 | NAS002 | M. S. G. College, Malegaon, Dist.-Nashik | 500 |
| 9 | PUN011 | Annasaheb Magar Mahavidyalaya, Hadapsar, Pune 411028 | 1000 |
| 10 | PUN009 | H.V. Desai Mahavidyalaya, Near Shaniwar Wada, Budhawar Peth, Pune 411002 | 400 |
| 11 | PUN001 | Aabasaheb Garware College, Pune | 500 |
| 12 | PUN002 | Dr.D.Y.Patil College, Opp.YCM Hospital, Sant Tukaram Nagar, Pimpri, Pune 411018 | 1000 |

| Sr. No. | Code | Exam Center Name | Count |
|---|---|---|---|
| 13 | PUN003 | Modern Arts, Com. & Science College, Shivaji Nagar, Pune 411005 | 500 |
| 14 | PUN004 | Yashwantrao Mohite College, Paud Road, Pune | 500 |
| 15 | PUN005 | Poona College, K.B.Hidayatullha Marg, Camp, Pune 411001 | 500 |
| 16 | PUN006 | C.T.Bora College, Shirur, Dist. Pune | 500 |
| 17 | PUN007 | Vidya Prathishthan's Art's , Science & Commerce College, Bigvan Road, Baramati, Dist- Pune | 500 |
| 18 | PUN008 | Arts, Commers & Science College, Indapur, Dist. Pune | 500 |
| 19 | AHM006 | Pemraj Sarada Mahavidyalaya, Ahmednagar, Ahmednagar | 500 |
| 20 | NAS004 | R.N.C. College, Nashik Road, Nashik | 500 |
| 21 | PUN010 | Shri Shahu Mandir Mahavidyalaya, Parvati, Pune 411009 | 500 |
| **KOLHAPUR** | | | |
| 1 | KOL001 | Kamla College, Rajaram Puri, Kolhapur | 500 |
| 2 | KOL002 | Mahavir College, Nagala Park, Kolhapur | 500 |
| 3 | KOL003 | Karmaveer Hire Mahavidyalaya, Mauni Vidyapeeth, Gargoti, Dist.-Kolhapur | 500 |
| 4 | KOL004 | Shivraj Mahavidyalaya, Gadhinglanj, Dist.Kolhapur | 500 |
| 5 | SAN001 | Smt. Kasturbabi Walchand College, Timber Market, Sangli | 1000 |
| 6 | SAN002 | Karmaveer Bhaurao Patil Mahavidyalaya, Islampur, Dist.-Sangli | 500 |
| 7 | SAT001 | Chhatrapati Shivaji College, Satara, | 1000 |
| 8 | SAT002 | Mudhoji College, Phaltan, Dist.-Satara | 500 |
| 9 | SAT003 | Sadguru Gadge Maharaj College, Karad, Dist.-Satara | 500 |
| **SOLAPUR** | | | |
| 1 | SOL001 | Sangameshwar College, 165, Railway lines, Sat Rasta, Solapur 413001 | 1000 |
| 2 | SOL002 | Shivaji Mahavidyalaya, Barshi, Dist.-Solapur 412411 | 1000 |
| 3 | SOL003 | Karmaveer Bhaurao Mahavidyalaya, Karmvir Path, Pandharpur, Dist.-Solapur 413304 | 500 |
| **JALGAON** | | | |
| 1 | DHL001 | Jai Hind Educational Trust's Zulal Bhilaji Patil College, Dhule | 500 |
| 2 | DHL002 | S.S.V.Ps Arts & Commerce College, Dhule | 600 |
| 3 | DHL003 | R. C. Patel College, Shirpur, Dist.-Dhule | 400 |
| 4 | JAL001 | Mulaji Jetha Mahavidyalaya, Jalgaon | 1100 |
| 5 | JAL002 | Pratap College, Amalner, Dist.-Jalgaon | 800 |
| 6 | JAL003 | Busawal Arts,Science & P.O. Nahata Commerce College, Busawal, Dist.Jalgaon | 1000 |
| 7 | NAN001 | G.T.P. College, Nandurbar, Nandurbar | 1000 |
| 8 | NAN002 | Jijamata Shikshan Sansthe's Arts, Science & Commerce College, Nandurbar | 500 |
| **AURANGABAD** | | | |
| 1 | AUR001 | Deogiri College, Station road, Aurangabad | 1000 |
| 2 | AUR002 | Vivekanand College, Samarth Nagar, Aurangabad | 1000 |
| 3 | BEE001 | Bankatswami College, Beed | 700 |

| Sr. No. | Code | Exam Center Name | Count |
|---|---|---|---|
| 4 | BEE002 | Balbhim College, Beed | 1000 |
| 5 | BEE003 | Yogeshwari College, Ambajogai | 1000 |
| 6 | OSM001 | R.P.College, Osmanabad | 700 |
| 7 | JLN001 | M.S.S.College, near over bridge, Motibag Jalna | 1000 |
| **NANDED** | | | |
| 1 | HIN001 | Adarsh College, Hingoli | 500 |
| 2 | LAT001 | Dayanandan College, Latur | 500 |
| 3 | LAT002 | Mahatma Gandhi Mahavidyalaya, Ahmedpur, Dist. Latur | 500 |
| 4 | NND001 | Yashwant College, Nanded | 500 |
| 5 | NND002 | Baliram Patil Mahavidyalaya, Kinvat, Dist. Nanded | 500 |
| 6 | PAR001 | Shivaji College, Parbhani | 500 |
| **AMARAVATI** | | | |
| 1 | AKL001 | Shri. Shivaji College, Akola | 700 |
| 2 | AKL002 | Sitabai Arts College, Akola | 750 |
| 3 | AKL003 | Shri. Shivaji Mahavidyalaya, Akot , Dist. Akola | 750 |
| 4 | AMR001 | Vidyabharati College, Amravati | 800 |
| 5 | AMR002 | Government Vidarbha Arts & Science Institute, Amravati | 700 |
| 6 | AMR003 | Shri. Shivaji Arts & Commerce College, Amravati | 700 |
| 7 | AMR004 | Mahatma Phule Arts, Commerce & Sitaramji Chaudhary Science College, Varud, Dist. - Amravati | 500 |
| 8 | BUL001 | Jijamata Mahavidyalaya, Buldhana | 994 |
| 9 | WAS001 | Rajasthani Aryan Arts, Shri. Mithulalji Kacholiya Commerce & Shri. Satyanarayanji Ramkrushnaji Rathi Science Mahavidyalaya, Washim | 600 |
| 10 | YAV001 | Amolkchand College, Yavatmal | 500 |
| 11 | YAV002 | Arts & Commerce College, Yavatmal | 500 |
| 12 | YAV003 | Phoolsingh Naik College, Pusad, Dist. Yavatmal | 600 |
| **NAGPUR** | | | |
| 1 | NBHA001 | J. M. Patel Mahavidyalaya, Bhandara | 750 |
| 2 | BHA002 | S.N.More College Arts & Science, Tumsar, Dist. Bhandara | 500 |
| 3 | CHA001 | Sardar Patel Mahavidyalaya, Chandrapur, Chandrapur | 900 |
| 4 | CHA002 | Janata College, Chandrapur | 600 |
| 5 | CHA003 | Vivekanand College, Bhadrawati, Dist. Chandrapur | 400 |
| 6 | CHA004 | Gurunanak Science College, Ballarshah, Dist. Chandrapur | 400 |
| 7 | GAD001 | Shivaji Mahavidyalaya, Gadchiroli | 525 |
| 8 | GON001 | Dhote Bandhu Vidnyan Mahavidyalaya, Gondiya | 500 |
| 9 | GON002 | N. M. D. Mahavidyalaya, Gondiya | 500 |
| 10 | NAG001 | Vasantrao Naik Shaskiya Kala, Samajvidnyan Sanstha, Nagpur | 800 |
| 11 | NAG002 | Govt. Institute of Science, Nagpur | 600 |
| 12 | NAG003 | Mahila Mahavidyalaya, Ganesh Nagar, Near Sangam Talkies, 152, Nandanvan, Nagpur | 500 |

| Sr. No. | Code | Exam Center Name | Count |
|---|---|---|---|
| 13 | NAG004 | Kamala Nehru Mahavidyalaya, Nagpur | 500 |
| 14 | NAG005 | G. S. Commerce Mahavidyalaya, Nagpur | 500 |
| 15 | NAG006 | Dr Ambedkar Commerece College, Diksha Bhumi, Nagpur | 400 |
| 16 | NAG007 | Science College, Congress Nagar, Nagpur | 500 |
| 17 | WAR001 | G.S.Commerce College, Wardha, Wardha | 500 |
| 18 | WAR002 | Yashwant Mahavidyalaya, Wardha | 400 |
| 19 | NAG008 | Central India College of Education, Gondhani, Nagpur | 500 |

# B.Ed. (Regular) First Year Admissions 2015-16 - Time Table

| Sr No | Programme | From | To |
|---|---|---|---|
| | **Phase I - Online Registration , Payment of Fees , Filling of Application Form** | | |
| 1 | Online Registration, Payment of Fees & Application Form filling | 2 July | 12 July 15 |
| 2 | Schedule for Fee Acceptance at SBI Bank, through Computer Generated Challan OR Online Payment Gatway | 2 July 15 | 14 July 15 |
| 3 | Schedule for the Candidates who paid the fees at SBI Bank, till dated 14.07.2015, can Fill the remaining Online Application Form. | 17-July-15 | |
| 4 | Online Registration, Payment of Fees & Application Form filling for Payment Mode Other Than SBI Challan | 2 July 15 | 17 July 15 |
| | **Phase II - Common Entrance Test (CET) & English Language Content Test (ELCT)** | | |
| 5 | Admit Card Available in Candidates Login | 19 July 15 | 25 July 15 |
| 6 | Examination - Common Entrance Test (CET) | 25 July 15<br>11.00 am – 12.00 pm | |
| 7 | Examination - English Language Content Test (ELCT) | 25 July 15<br>1.00 am – 2.00 pm | |
| 8 | Common Entrance Test Result and Distribution of score-cards | 07 Aug. 15 | |
| | **First Round - Option Form Filling & Admission** | | |
| 9 | Eligible candidates in Academic & CET score shall fill the preferential order form or the colleges of their choice online | 07 Aug. 15 | 17 Aug. 15 |
| 10 | Publishing college wise list of admitted candidates in 70%, 28%, 2% Quota on website. | 21 Aug. 15 at 3.00 pm | |
| 11 | Issuing Provisional Admit letters to candidates provisionally Admitted in 70%, 28%, 2% quota in Candidates Login | 21 Aug. 15 | 24 Aug. 15 |
| 12 | Admitted students, Report to concerned college and finalize the Admission. Colleges will update the admissions online from their login | 21 Aug. 15 | 25 Aug. 15 |
| | **Second Round - Option Form Filling & Admission** | | |
| 13 | Eligible candidates, who want fill up the New Option Form or want to change the College preferences can change or fill up the option form. | 22 Aug. 15 | 25 Aug. 15 |
| 14 | Publishing college wise list of admitted candidates in 70%, 28%, 2% Quota on website. | 28 Aug. 15 at 3.00 pm | |
| 15 | Issuing Provisional Admit letters to candidates provisionally Admitted in 70%, 28%, 2% quota in Candidates Login | 28 Aug. 15 | 01 Sept. 15 |
| 16 | Admitted students, Report to concerned college and finalize the Admission. Colleges will update the admissions online from their login | 28 Aug. 15 | 02 Sept. 15 |
| | **Waiting List Round at College Level - Option Form Filling & Admission** | | |
| 17 | Eligible candidates, who want fill up the New Option Form or want to change the College preferences can change or fill up the option form. | 28 Aug. 15 | 02 Sept. 15 |
| 18 | College-level admissions from Waiting list For the remaining vacant seats in the college (all vacant Seats will be converted into 70%), Colleges will update the admissions online from their login | 05 Sept. 15 | 11 Sept. 15 |